७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १०५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# गडाच्या विकासासाठी कटिबद्ध – मुख्यमंत्री

## नारळी सप्ताहाच्या समारोपास लाखो भाविकांची उपस्थिती

**बीड (दै. संध्या)**

"मी येथे मुख्यमंत्री म्हणून नाही, तर गहिनीनाथ महाराजांचा अनुयायी म्हणून नतमस्तक होण्यासाठी आलो आहे. गहिनीनाथ गडाच्या विकासाचे प्रश्न सोडविण्यास कटिबद्ध आहे," असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. म्हसोबावाडी (ता. आष्टी, जि. बीड) येथे पार पडलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या 94 व्या नारळी सप्ताहाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.



संत वामनभाऊ महाराज यांनी सुरू केलेल्या या पवित्र परंपरेचा समारोप गुरुवारी (दि. ९) काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी गहिनीनाथ गडाचे विठ्ठल महाराज, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार धनंजय मुंडे, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, प्रताप ढाकणे, सरपंच शिवा शेकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "संत वामनभाऊ यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. नाथ संप्रदायात गहिनीनाथांचे महात्म्य मोठे असून, या गडावर प्रत्येक काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडते, हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे." विशेष म्हणजे, या नारळी सप्ताहाचे नियोजन २०३९ पर्यंत निश्चित झाले आहे, यातच या भक्तीकार्याचे यश दिसते. समाजाला एकत्र आणण्याचे हे काम अतिशय मोलाचे आहे.

मंत्री मुंडे यांनी, "गहिनीनाथ गडाचा नारळी सप्ताह कायमस्वरूपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यजमानपदाखाली व्हावा व त्यांनी गड दत्तक घ्यावा," अशी मागणी केली. तसेच दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या विचारांवर आपण काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार धनंजय मुंडे म्हणाले की, "संत वामनभाऊ यांनी सुरू केलेला हा सप्ताह आज महंत विठ्ठल महाराज यांच्या जन्मगावी होत आहे, हा विशेष योगायोग आहे. गेल्या २५ वर्षांपासून मला येथे पूजनाचा मान मिळत आहे." दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी नगर-बीड महामार्गाच्या कामासाठी भरीव निधी देण्याची मागणी करत, या रस्त्यावर होणाऱ्या अपघातांकडे मुख्यमंत्री यांनी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास भाविकांची मोठी गर्दी होती.



## पार्थ पवार यांनी घेतली राज्यसभेची शपथ

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अजित पवार हे सर्वसामान्यांचे नेते होते. ते पहाटे लवकर उठून कामाला लागायचे. ते अतिशय शिस्तप्रिय होते. त्यामुळे त्यांचा प्रशासनात वचक होता. प्रशासकीय कामकाजात कुठेही त्रुटी असेल आणि ती अजित पवार यांच्या लक्षात आली तर ते अधिकाऱ्याला सर्वांसमोर झापायचे. त्यामुळे अधिकारी वर्ग देखील फार काटेकोरपणे आपापली कामे चोख पार पाडायचा प्रयत्न करायची. अजित पवार हे एखाद्या ठिकाणी दौऱ्यावर गेले तर ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याचा पुरेपूर प्रयत्न करायचे. त्यांच्या भेटीसाठी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ते भेटायचे. त्यांची समस्या जाणून घ्यायचे. तसेच अनेकदा ते जागेवर अनेकांची कामे सोडवायचे. त्यामुळे अजित पवार हे खूप लोकप्रिय झाले. अजित पवार जिथे जात तिथे त्यांचं वलय ठळकपणाने दिसून यायचं. पण दुर्दैवाने विमान अपघातात त्यांचं निधन झाल्याने राज्याच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली. त्यामुळे पवार कुटुंबासाठी आज भावनिक क्षण होता. कारण अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांचे ज्येष्ठ पुत्र पार्थ पवार हे आज पहिल्यांदा संसद भवनची पायरी चढले. अजित पवार यांच्या निधननंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यामुळे त्यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यानंतर आता राज्यसभेवर पार्थ पवार यांची बिनविरोध निवड झाली.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

## हिंजवडीतील वीजपुरवठा खंडित होण्यामागे मेट्रोचे काम नसल्याचा प्रशासनाचा दावा



**पिंपरी (दै. संध्या)**

हिंजवडी येथील याशविन हाउसिंग सोसायटी परिसरातील वीजपुरवठा खंडित होण्यामागे शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो कामाचा काहीही संबंध नाही, असा दावा मेट्रो प्रशासनाने केला असून मेट्रो कामासाठी हिंजवडी मार्गावरील सर्व युटिलिटी केबल्स उत्खननाच्या खूप आधीच स्थलांतरित केल्या होत्या. संबंधित ठिकाणचे काम बिघाड झाल्याच्या चार ते पाच दिवस आधीच पूर्ण झाले होते, असे 'पीआयटीसीएमआरएल' प्रशासनाचे म्हणणे आहे. भूमिगत वीज वाहिनीचे नुकसान झाल्यामुळे याशविन हाउसिंग सोसायटीच्या रहिवाशांना त्रास झाला. मेट्रोचे सुरू असलेले बांधकाम याचे कारण असल्याचे 'एमएसईबी'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते. मात्र, मेट्रो प्रशासनाने विद्युत बिघाडाच्या ठिकाणी मेट्रोशी संबंधित उत्खननाचा कोणताही राडारोडा नव्हता. परिसरात दिसणारे काँक्रीटचे साहित्य हे पूर्वीच्या कामांमधील आधीपासूनच असलेला राडारोडा आहे. मेट्रोच्या कामाचा वीजपुरवठा खंडित होण्याशी मेट्रोचा काहीही संबंध नाही. सध्याच्या युटिलिटीजच्या बाबतीत मेट्रो योग्य ती खबरदारी घेत आहे आणि संबंधित अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करत आहोत, असे मेट्रो प्रशासनाने सांगितले.

# अशोक खरातप्रकरणात प्रतिभा चाकणकरांची चौकशी

## शिर्डी पोलिस नोटीस पाठवणार; कोट्यवधींचा व्यवहार

**अहिल्यानगर (दै. संध्या)**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातला एसआयटीने आज पुन्हा एकदा न्यायालयात हजर केले होते, यावेळी न्यायालयाने अशोक खरातला आणखी 5 दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. त्यामुळे, खरातचा पोलिसांच्या कोठडीतील मुक्काम आणखी वाढला आहे. खरातवर एकूण 12 गुन्हे दाखल असून एसआयटीने न्यायालयातून आज लगेचच तिसऱ्या गुन्ह्यात त्याचा ताबा घेतला. सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल असलेला हा तिसरा गुन्हा अत्यंत गंभीर असून, एका 7 महिन्यांच्या गरोदर महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप खरातवर आहे. प्रसूती सुरळीत व्हावी आणि मुलगाच होईल, असे आमिष दाखवत त्याने महिलेवर अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. एकीकडे खरातची कसून चौकशी सुरू असताना दुसरीकडे खरातशी संबंधितांनाही पोलिसांकडून नोटीस बजावली जात आहे. अशोक खरातशी जवळीक असल्याच्या कारणावरुन रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर, रुपाली चाकणकर यांना एसआयटी पथकाने नोटीसही बजावल्याची माहिती होती, मात्र अद्याप त्यांची कुठलीही चौकशी झाली नाही. आता, रुपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा चाकणकर यांना शिर्डी पोलिस नोटीस बजावणार असल्याची माहिती आहे. समता पतसंस्थेतील खात्यांसदर्भात पोलिस त्यांची चौकशी करणार आहे.



समता पतसंस्थेत प्रतिभा चाकणकर यांचे देखील चार खाते आहेत. प्रतिभा चाकणकर यांच्या नावे दोन तर त्यांच्या मुलांच्या नावे दोन खाती आहेत. विशेष म्हणजे, या चार खात्यांवर 2 कोटी 40 लाख रुपयांचा व्यवहार झाल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांच्या हाती लागल्याने आता या पैशांसदर्भात आणि आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी होणार आहे.

समता पतसंस्थेत भोंदू अशोक खरात नॉमिनी असलेले 100 खाते तर सिन्नर येथील जगदंब पतसंस्थेत खरात नॉमिनी असेलेले 32 खाते आहेत. सिन्नर येथील जगदंब 32 खात्यांची चौकशी नाशिक ग्रामिण पोलीस करणार असून समता पतसंस्थेतील खात्यांची चौशी शिर्डी पोलिसांकडून केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रतिभा चाकणकर यांची चौकशी होणार असल्याची विश्वसनीय सुत्रांची माहिती आहे.

दरम्यान, आज न्यायालयात तपास अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरोपी अशोक खरात लोकांना नकली साप आणि वाघ दाखवून घाबरवत असे. तसेच मंतरलेले खडे, चिंचोके विकून फसवणूक करत होता. महिलांना काही द्रव्य किंवा पेढे खाऊ घालून अत्याचार केल्याचा संशय असून, त्या पदार्थांमध्ये काय मिसळले जात होते, याचा तपास करणे आवश्यक आहे. तसेच नकली साप, वाघ आणि इतर साहित्य तो कुठून आणत होता, याचाही तपास बाकी असल्याचे त्यांनी सांगितले.

## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### पती-पत्नीचा मृत्यू

नागपूर (दै. संध्या) : नागपूरमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. मद्यधुंद कारचालकाच्या निष्काळजीपणामुळं भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या भीषण अपघातात ज्येष्ठ नागरिक पती-पत्नीचा मृत्यू झाला आहे. बेलतरोडी पोलीस हद्दीत काल मध्यरात्री हा धक्कादायक प्रकार घडला आहे. उपचारादरम्यान जखमी पती-पत्नीचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनिष नगर-बेसा मार्गावरील पूर्ती बाजार परिसरात काल मध्यरात्रीच्या दरम्यान हा अपघात घडला. मद्यप्राशन करून भरधाव वेगात कार चालवत असलेल्या पंकज डेकाटे या बँक अधिकाऱ्याने दुचाकीवरील विजय सावरकर आणि सुरेखा सावरकर या दाम्पत्याला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोन्ही दाम्पत्य कारखाली बऱ्याच अंतरापर्यंत फरफटत गेलं. दरम्यान, अपघातानंतर आरोपी चालक घटनास्थळावरून फरार झाला होता. स्थानिक नागरिकांनी जखमींना तात्काळ मेडिकलमध्ये दाखल केलं. मात्र, आज उपचारादरम्यान दोघांचाही मृत्यू झाला आहे. बेलतरोडी पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल करत आरोपीला ताब्यात घेतलं आहे. पुढील तपास सुरू आहे.

**दै. संध्या अँकर** २०२९ ला बारामतीत काँग्रेसचा आमदार : हर्षवर्धन सपकाळ

# बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार

**मुंबई (दै. संध्या)**

बारामतीची पोटनिवडणूक लढली पाहिजे अशी काँग्रेस पक्षाची भूमिका होती, काँग्रेसचे हे वैचारिक पाऊल योग्यच आहे, कुठेही थांबता कामा नये ही भूमिका आहे. पण याबरोबर महाराष्ट्राची संस्कृती, समंजस्यपणा, सभ्यता याची एक किनारही आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटातील नेत्यांनी संवाद साधून उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची विनंती केली होती, त्यानंतर राज्यातील सर्व प्रमुख नेत्यांशी व पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून बारामतीतून काँग्रेसची उमेदवारी माघारी घेत आहोत, आज दोन पावले मागे येऊन माघार घेतली असली तरी २०२९ च्या निवडणुकीत बारामतीतून काँग्रेसचा आमदार असेल, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, दिवंगत अजित पवार यांचे काँग्रेस पक्षाशी अनेक वर्ष संबंध होते, हे संबंध लक्षात घेऊन काँग्रेस पक्षाने उमेदवारी मागे घ्यावी अशी विनंती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केली. तसेच त्यांच्या पक्षातील ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ, माजी मंत्री धनंजय मुंडे यांनीही फोन करून उमेदवारी मागे घेण्याची विनंती केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री मकरंद आबा पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार मनोज कायंदे, संजय खोडके, सना मलिक, राजेश विटेकर यांच्या शिष्टमंडळाने आज गांधी भवनला येऊन भेट घेत उमेदवार मागे घेण्याची विनंती केली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (श.प.) आमदार रोहित पवार यांनीही सकाळी भेट घेऊन उमेदवारी मागे घेण्याची विनंती केली. खा. सुप्रिया सुळे यांनीही फोन केला होता. शरद पवार साहेबांनी ही भावना व्यक्त केल्या होत्या. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्याशीही फोन करून संवाद साधला, त्यांच्या विनंतीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे पक्षप्रभारी रमेश चेन्नीथला व राज्यातील काँग्रेसच्या सर्व वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून बारामतीतून उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बारामतीतून काँग्रेस पक्षाने उमेदावारी मागे घेतली असली तरी अजित पवार यांच्या निधनाची चौकशी व्हावी या भूमिकेवर काँग्रेस पक्ष ठाम आहे. तसेच भाजपासारख्या विषारी व विखारी पक्षासोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सत्तेसाठी केलेली आघाडी न पटणारी व न रुजनारी आहे, त्याला आजही काँग्रेसचा विरोध कायम आहे, असे सपकाळ म्हणाले. पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला होता आणि बारामतीची निवडणूक बिनविरोध व्हावी अशी विनंती त्यांनी केली होती, यावेळी त्यांनी महाराष्ट्र संस्कृती हा शब्दही वापरला पण त्यांचा फोन व उमेदवारी माघारी घेणे याचा काहीही संबंध नाही. भाजपाला काँग्रेस पक्षाचा विरोध आहे व तो कायम असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



दिवंगत अजित पवार यांच्या अपघातावर काँग्रेसने घेतलेल्या भूमिकेबद्दल तसेच काँग्रेसशासित कर्नाटक सरकारने यासंदर्भात एफआयआर नोंदवून घेतल्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) आमदार रोहित पवार यांनी आभार मानले. तसेच काँग्रेस पक्षाबद्दल पार्थ पवार यांनी केलेल्या विधानाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. पार्थ पवार यांच्या वक्तव्याचे कोणीही समर्थन केलेले नाही. त्यांचे विधान अत्यंत चुकीचे, अनावश्यक व अपरिपक्व असल्याने त्याला जास्त महत्व देण्याची गरज नाही, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## पूर्ववैमनस्यातून अल्पवयीनांकडून गोळीबार, एक जखमी

**पुणे (दै. संध्या)**

'आज तुमचा विषयच संपवतो,' असे म्हणत अल्पवयीन गुन्हेगारांच्या टोळीने भररस्त्यात एकाला मारहाण करत त्याच्यावर गोळीबार केला. वडगाव बुद्रुक येथील चरवडवस्तीत पूर्ववैमनस्यातून झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यात एक १७ वर्षीय तरुण जखमी झाला. आरोपींनी त्याच्या साथीदाराच्या दिशेने फायर केले. मात्र, सुदैवाने तो बचावला. याप्रकरणी सिंहगड रोड पोलिसांनी गुन्हा दाखल करून पाच अल्पवयीन तरुणांना ताब्यात घेतले आहे. मंगळवारी (दि. ७) मध्यरात्री चरवडवस्ती भागात ही घटना घडली. याबाबत एका १७ वर्षीय तरुणाने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुण आणि त्याचे मित्र मंगळवारी रात्री पावणेबाराच्या सुमारास दुचाकीवरून जात होते. यावेळी चरवडवस्ती येथील मोकळ्या मैदानात आरोपींनी त्यांना अडवले. जुन्या वादाची खुन्नस मनात धरून आरोपींनी फिर्यादीला पाहताच, 'आज तुमचा खेळच संपवतो,' अशी धमकी देत शिवीगाळ सुरू केली. आरोपींनी फिर्यादीवर लोखंडी शस्त्रांनी वार केले आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. हाणामारी सुरू असतानाच, एका आरोपीने पिस्तूल काढून फिर्यादीच्या दिशेने थेट गोळीबार केला. पिस्तूलमधून सुटलेली गोळी फिर्यादीच्या मांडीत शिरली आणि तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. फिर्यादीच्या मित्रालाही जीवे मारण्याच्या उद्देशाने आरोपीने त्याच्या दिशेने गोळी झाडली, मात्र, सुदैवाने त्याचा नेम चुकला आणि मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर आरोपी परिसरात दहशत निर्माण करत पसार झाले. घटनेची माहिती मिळताच सिंहगड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुढील तपास सहायक निरीक्षक समीर करपे करत आहेत. आरोपी आणि फिर्यादी हे एकाच परिसरात राहण्यास असून, त्यांच्यात पूर्वीचे वाद होते. यातील जखमी झालेला तरुण रेकॉर्डवरील आहे, तर आरोपीतील दोघांवर यापूर्वीदेखील गुन्हे दाखल आहेत.



## संपादकीय

# १२,३०० हल्ल्यांनंतरही इराणची ताकद कायम कशी?



अमेरिका आणि इस्रायल मिळून इराणचा काही तासांत खात्मा करतील अशी अटकळ बांधली जात होती. खुद्द अमेरिकेनं तर अशा अनंत वल्गना केल्या आणि डरकाळ्या फोडल्या; पण इराणनं त्यांचे हे मनसुबे नुसते मातीतच मिसळविले नाहीत, तर त्यांना तोडीस तोड उत्तर दिलं. पण, इराणकडे असं काय होतं किंवा आहे की इतक्या चिवटपणे त्यानं अमेरिका आणि इस्रायलच्या प्रचंड हल्ल्यांना तोंड देत त्यांनाही जेरीस आणलं? सलग सहा आठवड्यांपासून सुरू असलेल्या अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यांनंतरही इराणची लष्करी क्षमता संपलेली नाही. खुद्द अमेरिकन गुप्तचर खात्याच्याच अहवालानुसार इराणचे जवळपास ५० टक्के लॉन्चर अजूनही अत्यंत सुरक्षित आहेत. बोगद्यांमध्ये आणि गुहांमध्ये त्यांनी लपविलेल्या क्षेपणास्त्रांना अमेरिका आणि इस्रायल अजून हातही लावू शकलेले नाहीत. आजही त्यांच्याकडे हजारो आत्मघाती ड्रोन उपलब्ध आहेत. गुप्तचर अहवालानुसार काही लॉन्चर असे आहेत, जे हल्ल्यांनंतर जमिनीखाली दबले गेलेत; पण नष्ट झालेले नाहीत. याशिवाय किनारी संरक्षणासाठी वापरली जाणारी क्रूज मिसाइल्सही त्यांच्याकडे मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत, ज्यामुळे होर्मुझमध्ये जहाजांसाठी धोका कायम आहे. ट्रम्प यांनी अनेकदा दावा केला की, इराणची मिसाइल आणि ड्रोन क्षमता मोठ्या प्रमाणात संपविली गेली आहे आणि त्याची शस्त्रनिर्मिती केंद्रं उद्ध्वस्त करण्यात आली आहेत, पण वस्तुस्थिती मात्र तशी नाही. सीएनएननंही आपल्या अहवालात याची पुष्टी केली आहे.अमेरिकेच्याच सेंट्रल कमांडनुसार इराणच्या १२,३०० पेक्षा जास्त ठिकाणांवर हल्ले करण्यात आले आहेत, तरीही इराणची युद्धक्षमता अजूनही शाबूत आहे. इस्रायलचा अंदाज आहे की, इराणचे केवळ २० ते २५ टक्के लॉन्चर सक्रिय आहेत, मात्र विविध बोगदे आणि गुहांमध्ये लपविलेली क्षेपणास्त्रे, युद्ध साहित्य आणि सुरक्षा प्रणाली यांचा यात समावेश नाही. इराणच्या रणनीतीचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांची भूमिगत ठिकाणं. त्यांनी आपली मिसाइल्स आणि लॉन्चर्स डोंगरदऱ्या, भूमिगत बोगदे आणि गुहांमध्ये अशा ठिकाणी लपवून ठेवली आहेत, की तिथपर्यंत पोहोचणं आणि ती नष्ट करणं सहज शक्य नाही. मुळात ती शोधणं हीच अतिशय कठीण बाब आहे. कारण आजच्या आधुनिक तंत्रज्ञानालाही त्यांनी चकमा दिला आहे. दुसरं आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे येनकेन प्रकारे अमेरिका आणि इस्रायल यांना त्यांच्या शस्त्रास्त्रांचा माग लागलाच, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीनं ती जागा त्यांना कळलीच, तरीही ज्याप्रमाणे सैनिक आपली जागा सतत बदलत असतात, त्याचप्रमाणे इराणही आपली शस्त्रास्त्रे आणि मोबाइल लॉन्चर्सची ठिकाणं वेगानं बदलत असतो. त्यामुळे त्यांच्यावर निशाणा साधणं आणखीच अवघड झालं आहे. अधिकाऱ्यांच्या मते इराणकडे अजूनही इतकी बॅलेस्टिक मिसाइल्स आणि लॉन्चर्स आहेत की तो इस्रायल आणि प्रदेशातील इतर ठिकाणांवर घातक हल्ले करू शकतो. होर्मुझ जलसंधी पूर्णपणे सुरक्षित करणंही अवघड आहे, कारण इराणची किनारी मिसाइल क्षमता संपलेली नाही आणि तीही भूमिगत ठिकाणांमध्ये लपविलेली असण्याची शक्यता आहे. जिथे इराणच्या नियमित नौदलाला मोठं नुकसान झालं आहे, तिथे रिव्होल्युशनरी गार्डची सागरी ताकद अजूनही मोठ्या प्रमाणात शिल्लक आहे. त्यांच्याकडे शेकडो लहान नौका आणि मानवरहित नौका आहेत, ज्यांचा वापर समुद्री मार्ग अडविण्यासाठी केला जाऊ शकतो.

## संस्कृत सुभाषित

गुरूची सेवा करी जो नर
तोचि उतरे पैलपार
त्यासी कै से दु:ख घोर
सदासुखी तोचि होय

अर्थ – हाच तो दृढभाव, गुरूकृपा झाल्याशिवाय परमेश्वरप्राप्ती होत नाही. हा मोक्षमार्गातील शाश्वत सिद्धांत आहे.

## गुरु वचन

### आई–वडिलांना विसरू नका

खूप छान गोष्ट आहे. मुलगा आणि वडिलांच्या नात्याची. हल्ली आई–बाप मुलांना जड झाले आहेत. त्यांना वृद्धाश्रमात धाडले जात आहे. यावरच ही कथा आहे.

एकदा एक वयोवृद्ध बाप आपल्या उच्च शिक्षित मुलासोबत घराच्या छतावरती बसला होता. तेथे एक कावळा आला. मुलाला बापाने विचारले, ते काय आहे? मुलगा म्हणाला कावळा. पुन्हा दुसऱ्यांदा बापाने विचारले, ते काय आहे? मुलाने पुन्हा उत्तर दिले कावळा.

तिसऱ्यांदाही बापाने विचारले ते काय आहे? मुलाने जरासे दात–ओठ खात म्हटले, कावळा. मग ते दोघे घरात गेले. त्याला पुन्हा बापाने विचारले ते आत्ता आले होते ते काय होते? मुलाचा संयम सुटला होता त्याने ओरडत सांगितले, समजत नाही का? कावळा...... कावळा... कावळा.

पाचव्यांदा बापाने विचारले ते आपण पाहिले ते काय होते? मुलगा आता मात्र जाम भडकला त्याने त्यांना सांगितले, का टाईमपास करताय? तुम्हाला कितीदा सांगितले तो कावळा होता म्हणून, तरी तुम्हाला समजत नाही का? का जाणून– बुजून त्रास देताय?

मग त्या वयोवृद्ध बापाने त्या मुलाला घरातील एक डायरी आणायला सांगितली. त्याने ती आणली, त्यात हीच कथा लिहिली होती.

परंतु, ती थोडी वेगळी होती. त्या बापाच्या जागी एक लहान मुलगा होता. त्याने बापाला एक–दोन नाही तर तब्बल २५ वेळा हाच प्रश्न केला होता, आणि तितक्याच वेळा त्याच्या वडिलांनी त्याच्या प्रश्नाला हसत हसत उत्तर दिले.

त्यांना त्याच्या विचारण्याचा मुळीच राग येत नव्हता, उलट त्यांना त्या मुलाचा निरागस स्वभाव आणि त्याचे ते विचारणे आवडत होते. तो बाप त्या मुलाचाच होता जो त्याला केवळ पाच वेळा विचारल्यावर त्यांच्यावर खेकसला.

फरक फक्त हाच, की मुलासाठी बापाने केलेले कष्ट, त्यांनी सहन केलेल्या सर्व वेदना तो विसरला होता. उलट त्याने वडिलांना केवळ दु:खच दिले. लक्षात ठेवा. तुमच्या आई–वडिलांनी तुमच्यासाठी कितीतरी कष्ट केले आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी केवळ दु:खच देत आहात? आई–वडिलांना विसरू नका. त्यांनी केलेल्या कष्टांना विसरू नका.

## उपदेशकथा

### सहज बोलण्यावर विश्वास व्यर्थ

एकदा एका स्त्रीचे मूल रात्री खूप रडू लागले. त्याला शांत करण्यासाठी तिने बरेच प्रयत्न केले पण ते मूल रडायचे थांबेना तेव्हा ती म्हणाली, 'हे बघ, बाहेर लांडगा आलाय. तू जर गप्प बसला नाहीस तर मी तुला त्या लांडग्याला देऊन टाकेन.' खरोखरंच त्यावेळी एक लांडगा तेथे आला होता. लांडग्याने ते बोलणे ऐकले आणि त्याला वाटले, ही बाई खरोखरंच त्या मुलाला आपल्या स्वाधीन करेल. शेवटी एकदाचे ते मूल रडायचे थांबले. झोपी गेले तेव्हा तो लांडगा उपाशीच जंगलात परतला. वाटेत त्याला एकदा कोल्हा भेटला. तो म्हणाला, 'काय मित्रा, तुझं तोंड कशानं उतरलंय?' लांडगा त्यास म्हणाला, 'अरे मित्रा, एका बाईच्या बोलण्यावर मी विश्वास ठेवला आणि फसलो. सगळी रात्र उपवास आणि जागरण करावं लागलं. अगदी थकून गेलो मी!'

कथा उपदेश : एखाद्याने अगदी सहज उच्चारलेल्या शब्दावर विश्वास ठेवू नये. त्या बोलण्याचा मागचा पुढचा संदर्भ लक्षात न घेतल्यास तो मूर्खपणा ठरेल.

## पंचांग

| | |
|---|---|
| १० एप्रिल २०२६ | तिथि:अष्टमी २३:१५:४९ |
| शुक्रवार | नक्षत्र:पूर्वाषाढा |
| विक्रम संवत्– २०८२ | ११:२७:३७ |
| चैत्रशके संवत्– १९४८ | योग:शिव १८:३०:०२ |
| संवत्सर –पराभवनाम | करण:बालव १०:२१:२४ |
| अयन– उत्तरायणारंभ | करण:कौलव २३:१५:४९ |
| मास– चैत्र | सूर्य:मीन |
| ऋतु– सौर वसंत | चन्द्र:मकर१८:०३:३९ |
| कृष्ण पक्ष | हिजरी सन् – १४४६ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ११४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | | | 3 | | 8 | | |
| | 8 | 6 | | | 2 | | | 7 |
| | 4 | 9 | | | | | 6 | 5 |
| | 2 | 4 | | | 1 | | | |
| 8 | | | | | | | | 3 |
| | | | 7 | | | 5 | 2 | |
| 9 | 1 | | | | | 4 | 7 | |
| 4 | | | 2 | | | 9 | 1 | |
| | | 7 | | 1 | | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ११३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 4 | 2 | 9 | 7 | 6 | 8 | 5 | 1 |
| 6 | 1 | 7 | 5 | 8 | 3 | 2 | 4 | 9 |
| 9 | 8 | 5 | 2 | 4 | 1 | 6 | 3 | 7 |
| 2 | 9 | 8 | 6 | 3 | 5 | 7 | 1 | 4 |
| 1 | 7 | 6 | 8 | 9 | 4 | 3 | 2 | 5 |
| 5 | 3 | 4 | 7 | 1 | 2 | 9 | 8 | 6 |
| 7 | 5 | 3 | 1 | 6 | 8 | 4 | 9 | 2 |
| 8 | 6 | 1 | 4 | 2 | 9 | 5 | 7 | 3 |
| 4 | 2 | 9 | 3 | 5 | 7 | 1 | 6 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१२ – टायटॅनिक त्याच्या पहिल्या आणि अखेरच्या प्रवासाला निघाले.
- १९२४ – न्यूयॉर्कमध्ये पहिले शब्दकोड्याचे पुस्तक (क्रॉसवर्ड) प्रसिद्ध झाले.
- २००६ – उत्तर चीनच्या शानक्शी प्रांतातील एका दवाखान्यात झालेल्या स्फोटात १५ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १३१७ – संत गोरा कुंभार समाधिस्त.
- १८७५ – स्वामी दयानंद यांनी मुंबईत आर्य समाजाची स्थापना केली.
- १९८२ – भारताचा पहिला बहुउद्देशीय उपग्रह इन्सॅट–१ केप कॅनव्हेरालहून प्रक्षेपित झाला.

### जन्म

- १७५५ – होमिओपॅथीचा जनक क्रिस्तिन फ्रीडरीश सॅम्युएल हानेमान यांचा जन्म.
- १८४७ – अमेरिकन पत्रकार व वृत्तपत्रमालक जोसेफ पुलित्झर यांचा जन्म.
- १८७६ – प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ, अनेक व्यापारी संस्थांचे प्रवर्तक वामन गोविंद काळे यांचा जन्म.
- १८९४ – प्रसिद्ध उद्योगपती घनश्यामदास बिर्ला यांचा जन्म.
- १८९८ – अंधश्रद्धाविरोधी लढा उभारणाऱ्या अब्राहम टी. कोवूर यांचा जन्म.
- १९०१ – अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांचा जन्म.
- १९०७ – नाटककार मो. ग. रांगणेकर यांचा जन्म.
- १९३१ – गानसरस्वती किशोरी अमोणकर यांचा जन्म.

### निधन

- १९३७ – ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे निधन.
- १९५४ – चलचित्रपटाचे जनक फ्रान्समधील चित्रपटनिर्माते ऑगस्ते ल्युमिये यांचे निधन.

## : SMS :

Patient: Doctor, yeh mera pehla operation hai. thoda dhyaan se karna.
Doctor: dara mat. yeh mera bhi pehla operation hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.७ | २१.२ |
| अहमदनगर | ३३.२ | २०.४ |
| अकोला | ३५.९ | २२.८ |
| अमरावती | ३५.७ | २२.८ |
| बीड | ३७.६ | २४ |
| भंडारा | ३६.६ | २२.८ |
| बुलढाणा | २४.६ | १६.७ |
| चंद्रपूर | ३७.३ | २४ |
| चेन्नई | ४५.५ | ३१.९ |
| नवी दिल्ली | २६.४ | १७.३ |
| धुळे | ३४.२ | २१.८ |
| गोंदिया | ३६ | २४.१ |
| जळगाव | ३५.१ | २३.१ |
| कोल्हापूर | ३४.४ | १९.२ |
| लातूर | ३४ | २१.३ |
| मुंबई | ३५.२ | २७.५ |
| नागपूर | ३६.१ | २२.४ |
| नांदेड | ३५.८ | २२.५ |
| नंदूरबार | ३१.८ | २२.४ |
| नाशिक | ३२ | २१.६ |
| पुणे | ३१.३ | १८.१ |
| पंढरपूर | ३६.८ | २२.३ |
| सातारा | ३३.९ | १८ |
| सांगली | ३६ | १९.८ |
| सोलापूर | ३६.६ | २३ |
| वर्धा | ३६.६ | २२.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व बौद्धीक कामाकडे जास्त लक्ष द्या. ओळखीच्या व्यक्तीचा फायदा करून घ्या.

**तुळ :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा:पूर्व आधिकारी वर्ग आपल्या कामावर खुष राहतील. हट्टीपणा करू नका.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम अडचणीवर मात कराल. सामाजिक यशात व प्रतिष्ठेत वाढ होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम एकादे महत्वाचे काम यशस्वी झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापार चांगला चालेल.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम शुभ कार्यात सहभागी व्हाल. व्यापारत मनासारखा फायदा मिळेल. प्रतिस्पर्ध्यापासून दूर रहा.

**धनु :** शुभ रंग:हिरवा,शुभ दिशा:पूर्व चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. कुटुंबात कुरबुर होण्याची शक्यता आहे. मानसिक समाधान मिळेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व व्यापारातील चढ–उतारामुळे मन चिंतीत राहील. मुलांच्या कामामुळे दु:खी व्हाल.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: दक्षिण विनयशील राहून कोणतेही काम केल्यास यश मिळेल. व्यापारात यश मिळण्यासाठी प्रयत्न केल्यास ते प्रयत्न यशस्वी राहतील.


**सिंह :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम एकादे महत्वाचे काम सफल झाल्याने आनंदी रहाल. आर्थिक स्थिती चांगली राहील. समाजात मान सन्मान मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम अगोदर योजलेले कामे पूर्ण होतील. आळसामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पूर्व योग्य दिशेने प्रयत्न केले तर अडकलेले पैसे मिळतील. व्यापार चांगला चालेल.

**मीन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम गुप्त कारवायांपासून सावध रहा. आवश्यकतेपेक्षा जास्त खेरदी करू नका. असंतुलन होण्याची शक्यता.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ११४



### आडवे शब्द

२. दक्षता
५. प्रश्नोत्तरांचे जुगलबंदी
९. उपेक्षित
१०. महिना
१२. शासन, शिक्षा
१४. जाडसर दळलेला गहू
१६. कस्तुरी देणारे हरीण
१९. नजरबंदीचा खेळ करणारा
२०. परंपरागत विचारसरणीचा
२३. भांडण
२४. गुंड
२५. समुद्रकिनारा
२९. प्राचीन
३०. दुधाचे पक्वान्न
३१. झाड
३३. उपकारांची जाणीव असलेला
३४. थट्टेखोर
३६. स्त्री
३९. बेलगाम, दावे
४१. रंग उडालेला
४२. काश्मीरचे प्रसिद्ध फळ
४५. सरावाने निष्णात
४८. जास्त
५०. नौका
५१. दया
५२. दरोडेखोर
५३. राग
५४. पुष्टी
५६. परंपरा
५८. समस्त
५९. गर्दी
६०. रागावलेला
६२. खळगा
६४. कोलकात्याचे जुने नाव
६६. नकारत्मक वृत्ती जोपासणारा
६८. बाग, अरण्य
६९. डाग
७१. विनोद (इंग्रजी)
७२. साय
७५. संकुचित वृत्तीचा
७७. हडकुळा
७८. बेळगाव सध्या या राज्यात आहे
७९. बळेच घोड्यावर चढवलेला

### उभे शब्द

१. अप्राय
२. धोकादायक
३. विष्णूची पत्नी
४. भाजून काढणारे
६. मतभेद, वाद
७. माळ, सर
८. वाचाळ, बहुभाषी
११. पन्ह्याचे फळ
१३. धरती
१५. वायू
१७. प्रशंसा
१८. दोन्हीकडून बडवला जाणारा
१९अ. फजिती
२०. समंजस
२१. व्यवस्थित
२२. प्रेम
२५. अमसुलाचे गरम पेय
२६. युद्धभूमी
२७. हा कोल्हापूरचा तांबडा–पांढरा प्रसिद्ध
२८. शेवट
३०. अडथळा
३२. कोरडा
३५. पांथस्थ
३७. काटा
३८. रामदासांचा ग्रंथराज
३९. आनंद
४०. महिला
४१. प्राक्तन
४३. चीर, सापट
४४. चैन
४६. अकबराशी लढणारा स्वाभिमान राजपूत राजा
४७. भेग
४९. 'स्वामी' कादंबरीचे नायक
५१. कंबर
५४. दासी
५५. काळिमा
५७. ही शाबासकीची असेल तर चांगली!
६१. साहित्यिक
६१अ. लग्नात वाटला जाणारा
६२. प्रत्येक
६३. पुष्कळ
६५. ध्येय
६७. सारखा
६८. माता
७०. पिशाच्च
७१. 'रमी'तील महत्त्वाचे पान
७३. झुंजार
७४. स्तुतीपाठक
७६. तांदळाचा एक पदार्थ

### जम्बो शब्दकोडे क्र. ११३ चे उत्तर

आडवे उत्तर : ३.भस्म ४.सुतराम ७.द्वारका १०.संत ज्ञानेश्वर १२.रंग १४.मका १५.ताक १६.तहहयात १९.केरसुणी २१.सरूप २३.विशद २६.जरा २८.जीवन २९.जलचर ३१.कुल ३२.नमक ३५.कायम ३६.जवळीक ३७.करवत ३९.हुज्जत ४०.नात ४१.फार ४३.हयगय ४७.अवगत ५०.करमणूक ५२.कवायत ५३.गाजरपारखी ५५.वाकी ५६.गदा ५७.सुरा ५८.मौन ६०.अस्वीकृत ६२.गौरी ६३.साम ६५.गीतांजली ६७.मास ६८.ऋण ६९.उपहार ७०.बरा ७१.मारा ७२.जीत ७३.गर्व ७४.कडा ७६.मिंधा ७७.चीन ७९.रिपु ८०.मार ८१.नश्वर ८२.विपरीत ८३.अघळपघळ

उभे उत्तर : १.कृतक २.साने गुरूजी ३.भरत ५.तरंत ६.राग ८.रमणी ९.काका १०.संतापजनक ११.दहशत १३.द्वार १७.हवि १८.याद २०.सुधा २२.पवना २४.मलम २५.अलक २७.रामरक्षा २९.जयजयकार ३०.रजत ३१.कुळीथ ३३.कव ३४.लज्जत ३८.तफावत ४०.नायक ४२.रग ४४.धमकी ४५.सुकर ४६.निकड ४७.अयशस्वी ४८.तगादा ४९.सुरसुरी ५१.रवानगी ५४.पारा ५६.गत ५९.लाजरा ६०.असमाधान ६१.कृमी ६२.गौण ६३.साप ६४.महाग ६६.तांबडा ६८.ऋत ६९.उर्वरित ७२.जीन ७४.कवळ ७५.गरळ ७७.चीर ७८.तूप ८०.माघ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### ह्युंदाई मोटर इंडिया तर्फे क्रेटा समर एडिशन

पुणे (दैनिक संध्या) : ह्युंदाई मोटर इंडिया लि.तर्फे क्रेटा समर एडिशन व्हेरिएंटस सादर करण्यात आले आहेत.यामध्ये अनेक तंत्रज्ञान आणि सोयी सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.मालकी अनुभव अधिक उंचावण्यासाठी डिझाईन केलेले क्रेटा समर एडिशन व्हेरिएंटस प्रगत तंत्रज्ञान,अधिक सुलभता आणि सुधारित सुरक्षिततेसाठी ग्राहकांच्या बदलत्या गरजांना प्रतिसाद देऊन मिड साईज एसयुव्ही सेगमेंटमध्ये ह्युंदाई क्रेटाचे निर्विवाद अग्रणी म्हणून असलेले स्थान अधिक मजबूत करतात.

### क्रिकेटच्या सर्वांत मोठ्या हंगामात सोशल तर्फे दुसरास्टेडियम 2026


पुणे (दैनिक संध्या) : क्रिकेटचा सर्वांत मोठा हंगाम सुरू होत असताना सोशल ने मॅच डे डेस्टीनेशनचा अनुभव घेण्यासाठी 28 मार्च ते 31 मे 2026 दरम्यान दुसरास्टेडियम उपक्रम ग्राहकांसाठी पुन्हा आणला आहे.याअंतर्गत संवादात्मक फॉरमॅट सह क्रिकेट बघण्याचा अनोखा अनुभव ग्राहकांना मिळेल.याचबरोबर भारतातील लोकप्रिय टीम्सने प्रेरित विशेष मेन्यू देखील उपलब्ध असेल.यामध्ये राजस्थान बॅलेस्टिक भजियाज,हैदराबाद ओजी हलिम बिर्याणी,लखनौ भारवान गलौटी,बंगळुरू ओजी स्टेडियम सामोसा,पंजाब सिक्सर छोले भटोरे,गुजरात फरसाण प्लॅटर,मुंबई वडा प्लॅटर,दिल्ली मॅच मोमोज,कोलकाता फिले-ओ-फिश बर्गर यासारख्या चविष्ट पदार्थांचा समावेश आहे.यावर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे इंटरॲक्टिव्ह मोबाईल क्रिकेट गेम.दुसरा स्टेडियम 2026 अनुभव हा पुणे,मुंबई,दिल्ली-एनसीआर,बंगळुरू,हैदराबाद, कोलकाता,लखनौ,चंदीगड आणि देहरादून मधील सोशल आऊटलेटसमध्ये मिळणार आहे.



### अधिवक्ता आलोक कुमार यांची सनातन संस्थेच्या गोवा येथील आश्रमाला भेट!

पुणे (दैनिक संध्या) : काशी आणि मथुरा या धार्मिक स्थळांची तथ्ये आणि पुरावे सर्व हिंदूंच्या बाजूंनी आहेत. न्यायालयात याविषयी लढा चालू आहे. एक अधिवक्ता म्हणून मी सांगेन की, ज्याप्रमाणे अयोध्येतील श्रीराममंदिर मुक्त झाले, त्याप्रमाणे येत्या १० वर्षांत काशी आणि मथुराही मुक्त होतील, असे स्पष्ट प्रतिपादन विश्व हिंदु परिषदेचे (विहिंपचे) आंतरराष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता आलोक कुमार यांनी सनातन संस्थेच्या रामनाथी, फोंडा, गोवा येथील आश्रमाच्या भेटीच्या वेळी केले. सनातनच्या आश्रमाला त्यांनी विहिंपच्या 'संत दर्शन आणि संवाद' या उपक्रमांर्तगत भेट दिल्यानंतर आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. अधिवक्ता आलोक कुमार पुढे म्हणाले, "येणारी शताब्दी हिंदूंची असेल. यापूर्वी रशियाची होती, आता अमेरिकेची आहे; पण ती संपत चालली आहे. कुठल्याही शताब्दीचे परिवर्तन हे ३० ते ४० व्या शतकात होते. त्यानुसार आता येणारी शताब्दी ही हिंदूंची, भारताची असेल. तसे चित्रही पहायला मिळत आहे. देशभरातील सर्व छोट्या-मोठ्या हिंदु संघटना आपापल्या परीने हिंदु धर्मासाठी कार्य करत आहेत. विहिंपकडूनही घरवापसीचे कार्य मोठ्या प्रमाणात चालू आहे. सध्या कुटुंबात पूर्वीसारखे संस्कार मिळत नसल्याने, तसेच कुटुंबाच्या सदस्यांतील एकमेकांशी संवाद हरवल्याने कौटुंबिक हानी होत आहे. हे ओळून विहिंप कौटुंबिक संवाद साधला जावा, यासाठीही उपक्रम राबवत आहे. आम्ही वेदांचाही प्रसार करत आहोत."

### पुण्यात साजरा होणार 'रोंगाली बिहू 2026'चा रंगतदार उत्सव




पुणे (दैनिक संध्या) : आसामचा पारंपरिक नववर्ष सण 'रोंगाली बिहू' निमित्त पुण्यात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'असोमी' या पुण्यातील आसामी समुदाय संघटनेतर्फे भारती विद्यापीठाच्या परफॉर्मिंग आर्ट्स विभागाच्या सहकार्याने 'रोंगाली २०२६' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४:३० वाजल्यापासून एरंडवणे येथील भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलाच्या खुल्या मैदानात पार पडणार आहे, अशी माहिती भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सचे संचालक प्रा.शारंगधर साठे यांनी दिली. या उत्सवाच्या माध्यमातून आसाम आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांच्या नववर्ष सणांचा एकत्रित जल्लोष साजरा करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी भारती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजीराव कदम  हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमातील मुख्य आकर्षणांमध्ये आसाममधील आमंत्रित कलाकारांची सादरीकरणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या कलाकारांकडून सादर होणारे ऊर्जा भरलेले बिहू नृत्य, तसेच 'कोनी जुज' (अंड्यांची लढत) यांसारखे पारंपरिक आसामी खेळ यांचा समावेश आहे. याशिवाय, शाकाहारी व मांसाहारी अशा विविध आसामी पदार्थांचे स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल्सही उपस्थितांसाठी उपलब्ध असणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य असून, पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### सीसीटीव्ही व तांत्रिक तपासाच्या आधारे अटक

पुणे (दैनिक संध्या) : कामशेत (ता.मावळ) शहरांमध्ये रविवारी (ता.२९ मार्च) रोजी रोहिदास चव्हाण व आकाश दत्ता पिंगळे (दोघे रा. साई ता.मावळ ) यांच्या खुनाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या तपासणीनंतर आरोपी रणजीत रामचंद्र वाडेकर (वय ३६) व निखिल जितेंद्र माने (वय २८ दोघे रा.दौंड कॉलनी कामशेत ) यांना अटक केली आहे. जुन्या रागातून सदर घटना घडली आहे.

# यावर्षीचा उत्सव ठरणार संस्मरणीय : परशुराम वाडेकर

## महापालिका उपलब्ध करून देणार अद्ययावत सुविधा



पुणे (दै. संध्या)

यावर्षी साजऱ्या होणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवासाठी महापालिकेच्य वतीने अध्ययवत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असून यावर्षीच्या जयंती उत्सव संस्मरणीय ठरेल, अशी ग्वाही उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. जयंती उत्सवाच्या तयारीचा प्रत्यक्ष आढावा पत्रकारांनाही घेता यावा यासाठी आंबेडकर पुतळा येथे आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेला उपमहापौरांसह स्थानिक नगरसेवक नीलेश आल्हाट, मनपा उपायुक्त परिमंडळ १ माधव जगताप, उपअभियंता बाळासाहेब पंडित, विठ्ठल गायकवाड, राहुल डंबाळे उपस्थित होते.

या वर्षी महापालिका प्रथमच अनेक प्रकारच्या सुविधा नव्याने उपलब्ध करून देणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरचा. आंबेडकर पुतळा, मंगळवार पेठेतील आंबेडकर भवन आणि कॅम्प परिसरातील आंबेडकर पुतळा या पूर्ण मार्गावर मंडपाचे आच्छादन घालण्यात येणार आहे, अशी माहिती उपमहापौरांनी दिली. भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी मंडपावर पाण्याची फवारणी, मंडपात हवा थंड ठेवण्यासाठी तसेच पिण्याच्या थंड पाण्यासाठी कुलरची व्यवस्थ करण्यात येणार आहे. या भागात सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या मर्यादित असल्यामुळे अत्याधुनिक यंत्रणा असलेल्या बसमधील फिरत्या स्वच्छतागृहांची सुविधा जयंती उत्सव काळात उपलब्ध करून दिली जाणार आहे, असेही वाडेकर यांनी सांगितले.

आंबेडकरी चळवळीच्या विचारांचा प्रसार करणारी पुस्तके नागरिकांना पाहता यावीत व विकत घेता यावी यासाठी फोटोझिंकोच्या गल्लीत पुस्तकांच्या स्टॉल्ससाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे कायदा सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलिसांनी केलेल्या सूचनेनुसार जयंती उत्सव काळात संपूर्ण परिसरावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर राहणार आहे, असेही वाडेकर यांनी स्पष्ट केले.

यावर्षीचा जयंती उत्सव अधिक देखणा, सुविधायुक्त आणि संस्मरणीय करण्यासाठी त्याच्या नियोजनाची जबाबदारी महापौर आणि आयुक्तांनी विश्वासाने आपल्यावर सोपवली असून त्यासाठी सर्व नगरसेवक आणि अधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य प्राप्त होत आहे, असेही वाडेकर यांनी नमूद केले.

यावर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती, क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या जन्मद्वीशताब्दी वर्षाचा प्रारंभ, चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष अशा अनेक प्रेरणादायी क्षणांचे स्मरण करून देणारे वर्ष असल्याने महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. त्याचप्रमाणे शहरातील सर्व पुतळ्यांची नियमित स्वच्छता आणि देखभाल केली जावी या दृष्टीने ही निर्णय घेतले जाणार आहेत, असेही वाडेकर यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी ज्या ज्या ठिकाणी जयंती उत्सव साजरा केला जात असेल त्या त्या ठिकाणी रात्री बारा वाजेपर्यंत महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित राहून त्या ठिकाणच्या सुविधा आणि स्वच्छता याचे नियोजन करणार आहेत. पोलिसांच्या सहकार्याने या काळात काही मार्गांत बदल करून वाहतुकीचेही योग्य नियोजन केले जाणार आहे, अशी माहिती उपायुक्त जगताप यांनी दिली. जयंती उत्सवाच्या ठिकाणी वैद्यकीय सुविधा आणि अग्निशामक दल देखील तैनात करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

### कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घ्या

आंबेडकर जयंती अथवा अन्य कोणत्याही महापुरुषांची संबंधित सण उत्सवाच्या वेळी वेळेच्या अथवा आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघनाशी संबंधित कार्यकर्त्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे त्वरित मागे घेतले जावे, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करण्यात आली असून त्याला निश्चितपणे सकारात्मक प्रतिसाद मिळेल, असा विश्वास वाडेकर यांनी यावेळी व्यक्त केला.

### सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांची स्वच्छता आठवड्यातून एकदा होणार

शहरात विविध महापुरुषांचे पुतळे आहेत मात्र त्यांची योग्य देखभाल हॉट नसल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती पासून शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांची आठवड्यातून एकदा स्वच्छता करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिल्याचेही उपमहापौर वाडेकर यांनी सांगितले.

## 'प्रवेशद्वार' सजले अन् औपचारिक लोकार्पणात फसले

पुणे (दै. संध्या)

शहराचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांगवी फाटा येथील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले उड्डाणपुलाखालील परिसरात पालिकेने कोट्यवधी रुपये खर्चून येथे विरंगुळा केंद्र आणि क्रीडा प्रकल्प साकारला. मात्र, या प्रकल्पाच्या औपचारिक उद्घाटनाला राजकीय नेत्यांनी फिरवलेली पाठ आणि प्रशासकीय समन्वयाचा अभाव दिसून आल्याने विधायक उपक्रमाच्या स्वागताला विनाकारण गालबोट लागले. हा प्रकल्प सांगवी परिसराची शान वाढवणारा आहे. शहराच्या औद्योगिक प्रगतीची आणि नागरी विकासाची साक्ष देणारे भव्य भित्तिशिल्प आणि आबालवृद्धांसाठी उभारलेली विविध आरोग्य साधने यामुळे या परिसराचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे. या प्रकल्पासाठी दोन कोटी रुपये खर्च केले आहेत. यामध्ये उड्डाणपुलाखालील अरुंद जागेचा कल्पकतेने वापर करण्यात आला असून, येथे आता केवळ सौंदर्यच नाही, तर नागरिकांच्या आरोग्यासाठी उत्तम सुविधा निर्माण झाल्या आहेत. सृजनशील कलाकारांनी साकारलेल्या भित्तिशिल्पातून 'विकासाची दिशा, पुढच्या पिढीसाठी आशा' हा संदेशही दिला आहे. वास्तुविशारद श्रुती शहा यांच्या कल्पकतेची यास जोड आहे. या उपक्रमात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा कट्टा, वॉकिंग ट्रॅक आणि बसण्याची सोय उपलब्ध आहे, तर व्यायामप्रेमींसाठी आधुनिक 'ओपन जिम' आणि योगासने व हास्य क्लबसाठी स्वतंत्र शेड उभारण्यात आली आहे. लहान मुले आणि तरुणाईच्या आवडीचा विचार करून येथे बॅडमिंटन, टेबल टेनिस आणि क्रिकेटसाठी स्वतंत्र सुविधांसह साहसी 'क्लाइंबिंग वॉल'चे आकर्षण साकारले आहे. या प्रकल्पात सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि वाहनतळाची व्यवस्था केली आहे. झालं गेलं विसरून वेगळेपण जपणारा हा कला आणि क्रीडा प्रकल्प आता नागरिकांसाठी पूर्ण क्षमतेने खुला करून द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## स्वारगेट येथे युवक काँग्रेसचे उग्र आंदोलन : वक्तव्याचा तीव्र निषेध

पुणे (दै. संध्या)




भारतीय जनता पक्षाचे आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी काँग्रेस अध्यक्ष तथा देशातील वरिष्ठ दलित नेते मा. मल्लिकार्जुन खर्गे यांच्याविषयी केलेल्या अत्यंत अपमानजनक व असंवेदनशील वक्तव्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस व पुणे शहर युवक काँग्रेसच्या वतीने आज स्वारगेट चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत "संविधान बचाव", "दलितांचा अपमान सहन करणार नाही" अशा जोरदार घोषणा दिल्या. आंदोलनादरम्यान हिमंता बिस्वा सरमा यांच्या वक्तव्याचा निषेध म्हणून प्रतीकात्मक "जोडे मारो" आंदोलन करण्यात आले तसेच त्यांच्या पुतळ्याचे दहन करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या वेळी परिस्थिती तणावपूर्ण बनल्याने पोलिस प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करत प्रतिबंधात्मक कारवाई केली आणि आंदोलनात सहभागी झालेल्या युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

युवक काँग्रेसच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, हिमंता बिस्वा सरमा यांनी केलेले वक्तव्य हे केवळ एका व्यक्तीवर केलेला अपमान नसून संपूर्ण दलित समाजाच्या स्वाभिमानावर झालेला थेट आघात आहे. भाजप व RSS च्या मनुवादी आणि प्रतिगामी विचारसरणीचे हे जिवंत उदाहरण असून अशा वक्तव्यांमुळे समाजात द्वेष आणि विषमता पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच, अखिल भारतीय काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेडा यांना बेकायदेशीररीत्या राज्याबाहेर नेऊन अटक करण्याचा प्रयत्न हा लोकशाही मूल्यांवर गंभीर आघात असून, विरोधकांचा आवाज दडपण्याचा हा प्रकार असल्याचेही युवक काँग्रेसने नमूद केले. युवक काँग्रेसने इशारा दिला आहे की, दलित समाजाचा अपमान आणि लोकशाहीविरोधी कृत्ये सहन केली जाणार नाहीत. अशा घटनांविरोधात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. देशातील सर्वात जेष्ठ दलित नेत्याच्या बद्दल भाजपा मुख्यमंत्री हेमंता बिस्वा सरमा यांनी केलेली टिप्पणी ही भाजपा संस्कृती दाखवते, मुख्य भ्रष्टाचाराच्या विषयाला बगल देत दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे असा सवाल यावेळी पुणे शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मा सौरभ अमराळे यांनी केला.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष मा. प्रथमेश अबनावे, पुणे शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मा सौरभ अमराळे, प्रदेश महासचिव महेश म्हेत्रे, प्रदेश महासचिव दिलीपसिंह देशमुख,भूषण रानभरे, प्रदेश सचिव निखिल मलके,विश्वजित जाधव, प्रदिप मेहकरे, अविनाश साळुंखे, अर्थव सोनार, पुणे शहर युवक काँग्रेस अभिजित चव्हाण उपाध्यक्ष सद्दाम शेख, कुणाल काळे, पर्वती विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष पुष्कर आबनावे, शिवाजीनगर विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष विक्रांत धोत्रे, रेहान बाबुर्डे, हर्षद हांडे, यश कोलते पाटील, सागर धावडे, विशाल कामेकर, पुणे जिल्हा युवक काँग्रेस सचिव भूषण पाटोदकर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सामाजिक संवेदनशीलता, जनभावनेला प्राधान्य आवश्यक

### डॉ. हुलगेश चलवादी : बारामती पोटनिवडणूक : काँग्रेसच्या भूमिकेवर 'आरपीआय'ची टीका

पुणे (दै. संध्या)



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) चे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.रामदास आठवले साहेबांनी बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याच्या आवाहनाचे पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी समर्थन केले आहे. लोकशाहीत प्रत्येक पक्षाला निवडणूक लढवण्याचा घटनात्मक अधिकार असला, तरी काही प्रसंगी सामाजिक संवेदनशीलता आणि जनभावनेला प्राधान्य देणे आवश्यक असते, असे मत व्यक्त करीत डॉ.चलवादी यांनी काँग्रेसच्या भूमिकेवर टीका केली.

अजित दादा यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात दिलेले योगदान मोठे असून, त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबीयांप्रती आदर व्यक्त करण्याची ही वेळ होती.अशा परिस्थितीत सुनेत्रा वहिनींविरोधात उमेदवार न उभा करता निवडणूक बिनविरोध करण्याचा विचार हा महाराष्ट्राच्या परंपरेला साजेसा ठरला असता, अशी भूमिका मा.आठवले साहेबांची असल्याचे डॉ.चलवादी यांनी नमूद केले. सुनेत्रा वाहिनी या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री असून त्यांना बिनविरोध निवडून देणे हा त्यांचा सन्मान ठरेल. हीच अजित दादांना खरी श्रद्धांजली असेल, अशी पक्षाची भूमिका असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

आरपीआयच्या (आ) भूमिकेचा पुनरुच्चार करताना डॉ.चलवादी म्हणाले की, ही केवळ राजकीय लढाई नसून सामाजिक मूल्ये आणि कृतज्ञतेची जाणीव जपण्याचा विषय आहे. काँग्रेस पक्षाने या प्रसंगी उमेदवार उभा करून जनभावनांचा विचार न करता राजकीय निर्णय घेतला असून, हे महाराष्ट्राच्या सुसंस्कृत परंपरेला धरून नाही. जनतेच्या भावना ओळखून निर्णय घेणे हेच खरे नेतृत्व असते आणि मा.आठवले साहेबांनी दाखवलेली भूमिका ही याच मूल्यांची जोपासना करणारी आहे. येणाऱ्या निवडणुकीत जनतेकडून या भूमिकेला निश्चितच प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला.

## हॉटेलमध्ये जेवणाचे बिल मागितल्याने मॅनेजरला मारहाण; गुन्हा दाखल

पुणे (दै. संध्या)



खराळवाडी येथील एका हॉटेलमध्ये जेवणाचे बिल मागितल्याचा राग धरून एका ग्राहकाने हॉटेलच्या मॅनेजरला गाडीच्या चावीने मारहाण करून जखमी केले. ही घटना सोमवारी (६ एप्रिल) रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास उडपी लंच होम, खराळवाडी येथे घडली. संत तुकारामनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेल मॅनेजर राघवेंद्र सीताराम शेट्टी (वय ४५, खराळवाडी, पिंपरी) यांनी संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी संकेत सकपाळ (वय २७, खराळवाडी, पिंपरी) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. संकेत सकपाळ याने सुरुवातीला हॉटेलमधील वेटरला शिवीगाळ केली. त्यानंतर, मॅनेजर शेट्टी यांनी त्याला जेवणाचे बिल मागितले असता, संकेतने रागाच्या भरात आपल्याजवळील ॲक्टिव्हा गाडीची चावी शेट्टी यांच्या मानेवर आणि डोक्यावर मारली. यामध्ये शेट्टी जखमी झाले आहेत.

## कॉपर वायर चोरणाऱ्या चोरट्यांना लक्ष्मी नगर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

पुणे (दै. संध्या)

दिनांक ०६/०४/२०२६ रोजी येरवडा पोलीस स्टेशन भारत डायग्नोस्टिक सेंटर ,राजीव गांधी हॉस्पिटल येरवडा पुणे येथील एम आर आय मशीनची हिरव्या रंगाची कॉपर वायर कापून चोरी केल्याबद्दल गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली लक्ष्मी नगर पोलीस स्टेशन तपास पथकाने अज्ञात आरोपीबाबत कोणतीही माहिती नसताना पोलीस शिपाई भीमराव कांबळे व पोलीस शिपाई सुरज ओंबासे यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज व इतर ठिकाणाच्या ५० सीसीटीव्ही फुटेज च्या मदतीने पाहिजे आरोपी निष्पन्न केले व ताडी गुत्ता, येरवडा पुणे या ठिकाणी सापळा रचून व संशयित आरोपीचा पाठलाग करून दिनेश भगवान साळवे वय २२ वर्षे, बद्रु जमान जिहाउल शेख वय २४ वर्ष, अब्राहिम नरेश यादव वय २० वर्ष, सचिन सुरेश गवळी वय ३६ वर्षे येरवडा या सगळ्यांचे सहभाग असल्याचे निष्पन्न करण्यात आले. त्यांच्याकडून ३५०० रुपये किमतीची एकूण 30 मीटर लांबीची हिरव्या रंगाचे प्लास्टिक आवरण असलेली कॉपर वायर हस्तगत करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या गेल्या नसून पोलिसांकडून कोणतेही असभ्य कृत्य झालेले नाही.

सदर कामगिरी पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग मनोज पाटील, परिमंडळात चार चे डी. सी. पी. रजनीकांत चुलमुला, साहेब पोलीस आयुक्त सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र कदम, पुणे विभागाचे पोलीस निरीक्षक उमेश गित्ते, सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकांत नंदनवार, पोलीस उपनिरीक्षक संदीप जगताप, पोलीस हवालदार शिंदे, कांबळे, पोलीस शिपाई ओंबासे, पोलीस शिपाई गायकवाड, पोलीस शिपाई कबीर शेख, पोलीस शिपाई परदेशी, पोलीस शिपाई जाधव व पोलीस शिपाई शिंदे यांनी सहभाग घेतलेला आहे, लक्ष्मी नगर पोलीस स्टेशनच्या पोलिसांकडून झालेल्या या कारवाईचे सर्वसामान्य नागरिकाकडून समाधान व्यक्त केला जात आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे...

### भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका जनगणनेस सज्ज; जनगणना डिजिटल होणार

भिवंडी (दैनिक संध्या) : भारतीय जनगणना २०२७ च्या प्रक्रियेला भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका क्षेत्रात सुरुवात झाली असून महानगर पालिका प्रशासन यासाठी सज्ज झाले आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणाऱ्या या जनगणनेसाठी महानगर पालिका कार्यक्षेत्रात आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी अनमोल सागर (भाप्रसे) व अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या मार्गदर्शनाखाली सूक्ष्म आराखडा नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून दि. ६ एप्रिल २०२६ ते दि. ८ एप्रिल २०२६ या तीन दिवसांचे कालावधीत महानगरपालिका नवीन प्रशासकिय इमारतीतील आयुक्त यांच्या सभा दालनात २८ फिल्ड ट्रेनर्सच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजन करण्यात आला. उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी विक्रम दराडे, सहायक आयुक्त नितीन पाटील, जनगणना विभाग प्रमुख माणिक जाधव, समन्वय अधिकारी सुभाष पार्टे यांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या या प्रशिक्षण वर्गातून मास्टर्स ट्रेनर्स अजय ठाकूर, सहायक संचालक - जनगणना व प्रा. अजित भोईर यांनी मनपा क्षेत्रातील नियुक्त २८ जनगणना क्षेत्रीय प्रशिक्षकांना डिजिटल जनगणने बाबत टप्पा निहाय सविस्तर माहिती दिली. या मुलभूत प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक प्रगणक व पर्यवेक्षक यांचेपर्यंत डिजिटल जनगणना बाबत अचूक माहिती पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या प्रशिक्षणात प्रामुख्याने जनगणना- २०२७ चा पहिला टप्पा असलेल्या घरयादी व घरगणनेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. डिजिटल स्वरूपामुळे यावेळी प्रगणकांना कागदी अर्जांऐवजी (CMMS) पोर्टल आणि एचएलबीसी (HLBC) ॲपचा वापर करावा लागणार आहे. या ॲपचे तांत्रिक ज्ञान, जनगणना कायदा व नियम आणि माहिती संकलनाची प्रक्रिया याबाबत या २८ फिल्ड ट्रेनर्सना हँड्स-ऑन ट्रेनिंग देण्यात आले.

### मंत्री मा. पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली सादरीकरण व कार्यशाळेचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि पशुपालन क्षेत्राला आधुनिकतेची जोड देण्यासाठी राज्य शासनातर्फे 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' राबविण्यात येत आहे. शासन निर्णय दि.९ मार्च २०२६ नुसार सुधारित केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी ग्राम पातळीपर्यंत होणेसाठी शुक्रवारी, १० एप्रिल २०२६ रोजी पशुसंवर्धन आयुक्तालयात एका विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यशाळेस पशुसंवर्धन विभागातील जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त तसेच प्रादेशिक पशुसंवर्धन उपायुक्त उपस्थित राहणार असून ही कार्यशाळा मा. मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. ग्रामीण स्तरावर पशुधनावर आधारित उद्योजकता वाढवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मंत्री मा. श्रीमती पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणाऱ्या या कार्यक्रमाला मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) व मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. पशुसंवर्धन आयुक्तालयातील कामधेनू सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ६.०० या वेळेत ही कार्यशाळा पार पडेल. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना, ही ग्रामीण महाराष्ट्रातील पशुपालकांसाठी आर्थिक व सामाजिक विकासाचे एक सशक्त माध्यम ठरणार आहे. ग्रामीण युवकांना केवळ पारंपारिक पशुपालन न करता, त्याकडे एक व्यावसायिक 'उद्योजकता' म्हणून पाहण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळी-मेंढी पालनासाठी तांत्रिक व आर्थिक मदत देऊन ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. पशुपालनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पशुजन्य उत्पादनांची उत्पादकता वाढवणे व स्थानिक स्तरावरच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून रोजगार विकासाच्या अधिकाधीक संधी निर्माण करण्यावर पशुसंवर्धन विभागाचा भर आहे.

# शून्यातून विश्व निर्माण करणारा 'खाकी'चा जिद्दी प्रवास!

## एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण पोलीस झाला

अहिल्यानगर (दै. संध्या) :



यश हे अपघाताने मिळत नाही, तर ते सातत्य, कष्ट, त्याग आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या स्वप्नांवर असलेल्या अढळ विश्वासाचे फळ असते. याचाच प्रत्यय संगमनेर तालुक्यातील नांदुरखंदरमाळ येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण ऋषभ यशवंत सुपेकर याने आणून दिला आहे. सलग सहा वर्षे अपयशाशी झुंज देत, पदोपदी होणाऱ्या टीकेला आपल्या कर्तृत्वाने उत्तर देत ऋषभ आता पुणे शहर पोलीस दलात दाखल झाला आहे. हा प्रवास केवळ एका नोकरीचा नसून, एका जिद्दी तरुणाच्या अस्तित्वाच्या लढाईचा विजय आहे. ऋषभचे वडील श्री. यशवंत दशरथ पाटील सुपेकर हे एकेकाळी तळेगाव दाभाडे येथे नोकरीला होते. मात्र, काळाच्या ओघात कंपनी बंद पडली आणि हातातील काम गेले. हार न मानता ते आपल्या मायभूमीला परतले. पत्नीच्या साथीने त्यांनी वडिलोपार्जित कोरडवाहू शेती कसण्यास सुरुवात केली. निसर्गाची अवकृपा आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे उदरनिर्वाह कठीण होता, तरीही त्यांनी इतर ठिकाणी कष्ट करून आपल्या मुलांच्या शिक्षणात कधीच खंड पडू दिला नाही. ऋषभ आणि त्याच्या बहिणीला उच्च शिक्षित करण्यासाठी या शेतकरी दांपत्याने रक्ताचे पाणी केले. ऋषभचे प्राथमिक शिक्षण नांदुरखंदरमाळ येथे झाले. मात्र, माध्यमिक शिक्षणासाठी साकुरला जाणे हे एक मोठे आव्हान होते. घरची परिस्थिती बेताची, स्वतःचे वाहन नाही आणि सार्वजनिक वाहतुकीची सोय नाही. अशा वेळी सकाळी लवकर उठून, नाश्ता न करता रस्त्यावर मिळेल त्या वाहनाला हात दाखवत साकुर गाठायचे, हा ऋषभचा नित्यक्रम होता. अनेकदा वाहन न मिळाल्यास साकुर ते नांदुर हा कठीण डोंगर घाट आणि रस्ता त्याला मैलोन्मैल पायी तुडवावा लागला. सोबत कमलेश, बबलू आणि इतर मित्र असायचे, पण पोटातील भूक आणि पायातील थकव्यापेक्षा मनात शिक्षणाची ओढ मोठी होती. यशाच्या इतक्या जवळ जाऊन मागे येण्याचे दुःख काय असते, हे केवळ ऋषभलाच ठाऊक होते. त्यातच समाजातील लोकांचे टोमणे, "याला जमणार नाही", "वेळ वाया घालवतोय" अशा बोलण्याने मन खचत होते. पण 'न थकता, न थांबता' या उक्तीप्रमाणे ऋषभने पुन्हा कंबर कसली.

### आळेफाट्याचा संघर्ष आणि भाकरीची माया

पुढील शिक्षणासाठी ऋषभ आळेफाटा येथील ज्ञानमाता कॉलेजमध्ये दाखल झाला. तिथेच त्याने एनसीसी (NCC) जॉईन केली आणि मनाशी खूणगाठ बांधली की, "काहीही झाले तरी देशसेवेसाठी वर्दी मिळवायचीच!" स्वप्न मोठे होते, म्हणून मेहनतही मोठी हवी होती. आळेफाटा येथील भाग्यविधाता करिअर अकॅडमीमध्ये त्याने प्रवेश घेतला. भाग्यविधाता करिअर अकॅडमी मध्ये त्याला आशिष सुपेकर सर व उत्तम गोरडे सर यांचे मार्गदर्शन लाभले. गावातून शैक्षणिक बसने येणारा घरचा डबा हाच त्याचा आधार असायचा. सकाळी आलेली भाकरी रात्री खातानाही त्याला ती ताजी वाटायची, कारण त्यात आई-वडिलांच्या कष्टाची चव होती. कधी अर्ध्या पोटी, तर कधी केवळ जिद्दीच्या जोरावर त्याने मैदानी सराव सुरू ठेवला.

## लिम्काचा फीड आता अनन्याच्या हाती

नवी दिल्ली (दै. संध्या) :

लिम्काच्या सोशल मीडिया फीडमागे आता एक नवीन नाव आहे, जिचा स्वतःचा मोठा चाहतावर्ग आहे! भारतातील लोकप्रिय लाइम एन लेमनी पेय लिम्काने अनन्या पांडे यांची दुहेरी भूमिकेत नियुक्ती केली आहे. अनन्या आता ब्रँडचा नवीन चेहरा असण्यासोबत सोशल मीडिया मॅनेजरची धुराही सांभाळणार आहेत. ब्रँडने ऑनलाइन जगात कसे दिसावे, कसे बोलावे आणि व्यक्तींशी कसे कनेक्ट व्हावे, याचे सर्व अधिकार आता या अभिनेत्रीकडे असतील. लिम्का गर्लचे भारतीय संस्कृतीत नेहमी खास स्थान राहिले आहे आणि गेल्या प्रत्येक पिढीचा आपापला फ्रेशनेस आयकॉन राहिला आहे. 2026 मध्ये, उत्साही आणि खेळकर अनन्या पांडे नवीन लिम्का गर्ल म्हणून समोर आल्या आहेत. पण एका आगळ्यावेगळ्या प्रयोगात लिम्काने आपल्या कंटेंट विश्वाची सूत्रे अनन्या यांच्या हाती सोपवली आहेत. त्यांचे कौशल्य, विनोदीशैली आणि कॅमेऱ्यासमोर वावरतानाची सहजता आता 2026 मधील लिम्काची ओळख ठरवणार आहे. गेल्या पाच दशकांपासून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लाइम एन लेमनी




■ ब्रँड ॲम्बेसेडर आणि सोशल मीडिया लीड म्हणून अनन्या पांडे यांनी धुरा स्वीकारली

स्वाद आणि वैशिष्ट्यपूर्ण क्लाऊडी बबल्ससह भारताला ताजेतवाने करणाऱ्या या ब्रँडच्या वारशाला आता धाडसी आणि नवा आवाज मिळाला आहे. हे सर्व नवीन व उत्साहवर्धक कंटेंट ब्रँडच्या 'फिल द ताज़गी या नवीन मोहिमेचा भाग असेल. कडक उन्हाळ्यात ताजेपणाची झुळूक देणारा फ्रेश, उत्साही आणि बबली कंटेंट पाहण्यासाठी सज्ज व्हा. अगदी 'फिल द ताज़गी' ही ओळ सुद्धा ब्रँडच्या सिग्नेचर रिफ्रेशमेंटचा आणि त्यातून मिळणाऱ्या आनंदाचा अनुभव घेण्याचे आवाहन करते. कोका-कोला इंडिया व साऊथवेस्ट एशियाच्या हायड्रेशन, स्पोर्ट्स आणि टी विभागाच्या मार्केटिंगच्या सीनियर डायरेक्टर अंकिता महना म्हणाल्या, "लिम्का नेहमी सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाचा भाग राहिली आहे. व्यक्तींना साध्या आणि त्वरित रिफ्रेशची गरज भासते.


**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे कार्यालय**

**मंडपसह फर्निचर, विद्युत व्यवस्था व इतर अनुषंगीक साहित्याचा पुरवठा करणेकरीता निविदा सुचना**

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
निवडणूक शाखा
पीईई-1A/कावि/252/2026
दि. 09/04/2026

पुणे जिल्ह्यातील होणाऱ्या आगामी लोकसभा विधानसभा/विधानपरिषद/शिक्षक व पदवीधर सार्वत्रिक निवडणूक 2024 कामकाजाकरीता, जिल्हा निवडणूक कार्यालय पुणे, व जिल्हयातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यलय अथवा सक्षम प्रधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी मंडप, फर्निचर, विद्युत व इतर अनुषंगीक साहित्य पुरवठा करणेकामी अनुभवी व योग्य अभिकर्त्याकडुन विहीत नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिधद करण्यात येत आहे.

**निविदेच्या कामाचा तपशील :-**

पुणे जिल्ह्यातील होणाऱ्या आगामी लोकसभा/विधानसभा/विधानपरिषद/शिक्षक व पदवीधर सार्वत्रिक निवडणूक 2024 कामकाजाकरीता, जिल्हा निवडणूक कार्यालय पुणे व जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम प्रधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी मंडप, फर्निचर, विद्युत साहित्य पुरवठा करणेसाठी ई निविदा

**सदर निविदेची कार्यक्रम पत्रीका खालील प्रमाणे राहील.:-**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजित रक्कम रुपये | २०,००,००,०००/- (रु. अठ्ठावीस कोटी फक्त) |
| कोऱ्या ई निविदा फॉर्मची किंमत रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) (विना परतावा) |
| बयाणा EMD रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | ४०,००,०००/- (रु. चाळीस लाख फक्त) |
| सुरक्षा अनामत रक्कम रुपये (ई-निविदा मंजूर झालेनंतर राष्ट्रीयकृत बँकची बँक गॅरंटी) | १,००,००,०००/- (रु. एक कोटी चाळीस लाख फक्त) |
| ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | १३/०४/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा ऑनलाईन स्वीकृतीचा दिनांक व वेळ | १३/०४/२०२६ ते २३/०४/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| निविदा पुर्व बैठक Pre- Tender Conference (PTC) दिनांक व वेळ | १७/०४/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. १ (निविदा तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | २४/०४/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. २ (व्यवसायिक/दराबायतचा लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | तांत्रिक निविदा उघडण्यात आल्यानंतर व्यवसायिक दराच्या लिफाफा उघडण्याबाबत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सुचित केली जाईल. |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे निवडणूक शाखा, बी. विंग. चौथा मजला, पुणे येथे राहील. |
| ई-निविदा संपर्क अधिकारी | श्री. सानप ना. तहसिलदार 8669971285 |

टिप :-


1. ज्या निविदाधारकांचे निविदा अर्ज http://mahatenders.gov.in या संकेस्थळावर निर्धारीत मुदतीत सादर केली जातील. केवळ त्याच निविदा विचारा घेण्यात येतील. सदर निविदेची वैद्यता 120 दिवसांकरीता राहील. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त 60 दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी, तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना राहील.
2. प्राप्त झालेल्या निविदा कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे यांनी स्वतः राखून ठेवले आहे.
3. सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
4. निविदेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांनी क्लास III डिजिटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर विहीत नाव नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.
5. निविदाधारकाने/प्राधिकृत प्रतिनिधीने निविदा Pre- Tender Conference (PTC) उपस्थित रहाणे आवश्यक आहे.
निविदेबाबतची पुर्व बैठक वरीलप्रमाणे निर्धारित दिवशी उपजिल्हा निवडणूक पुणे यांचे जिल्हाधिकारी कार्यालय, पूणे नवीन इमारत बी विंग, चौथा मजला, पुणे येथे राहील.
6. निविदाधारकांनी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या प्रतिनिधीने निविदा उघडण्याचे वेळी जिल्हाधिकारी कार्यालय. पुणे येथे उपस्थित रहावे.
7. सदर निविदेच्या अटी व शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सही/-
(जितेंद्र डुडी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक, अधिकारी, पुणे

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C129


# जॉनसन अँड जॉनसन ने भारतात नवीन टेक्निस नेक्स्ट-जनरेशन ओडिसी हे अत्याधुनिक इंट्राऑक्युलर लेन्स लॉन्च केले

पुणे (दै. संध्या) :




जॉनसन अँड जॉनसन ने आज जाहीर केले की त्यांनी भारतात टेक्निस ओडिसी आयओएल, लॉन्च करून त्यांच्या प्रेस्बायोपिया-करेक्टिंग इंट्राओक्युलर लेन्स (पीसी-आयओएल) च्या श्रेणीचा विस्तार केला आहे. ही नवीन फुल व्हिज्युअल रेंज आयओएल उच्च दर्जाची आणि सलग स्पष्ट दृष्टी प्रदान करते, यामुळे रुग्णांना दूर, जवळ आणि मधल्या सर्व अंतरांवर स्पष्ट दिसू शकते आणि चष्म्याची गरज कमी होते. उद्योगात आघाडीवर असलेल्या टेक्निस प्लॅटफॉर्मवर आधारित, प्रगत ऑप्टिक्स आणि विशेष साहित्य वापरून तयार केलेला टेक्निस ओडिसी आयओएल, सातत्यपूर्ण, स्पष्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट असलेली दृष्टी प्रदान करते. यामुळे 93 % रुग्णांना चष्म्यापासून मुक्ती मिळते आणि सर्व अंतरांवर स्पष्ट दृष्टी प्राप्त होते."टेक्निस ओडिसी आयओएल, मोतीबिंदूच्या रुग्णांसाठी, चष्म्यावर कमी अवलंबून राहण्याची गरज पूर्ण करण्यास मदत करतो. + भारतामध्ये याची सुरुवात झाल्यामुळे प्रगत आयओएल तंत्रज्ञान अधिक लोकांपर्यंत पोहोचेल, जे सर्व अंतरांवर उच्च दर्जाची आणि सतत स्पष्ट दृष्टी देण्यासाठी तयार केलेले आहे. टेक्निस प्युअरसी सोबत मिळून, टेक्निस ओडिसी आयओएल, आमच्या आयओएल पोर्टफोलिओची ताकद आणि व्याप्ती वाढवते, ज्यामुळे आजच्या वाढत्या वयाच्या लोकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यात आम्हाला मदत होते," असे सर्जिकल व्हिजन इंडिया & साऊथ एशिया, जॉनसन अँड जॉनसन चे कंट्री मॅनेजर, बुरझिन शाहाना यांनी सांगितले.टेक्निस ओडिसी असे डिझाईन केलेले आहे की डॉक्टरांना अधिक आत्मविश्वासाने उपचार करता येतात, कारण त्यातील फ्रीफॉर्म डिफ्रॅक्टिव्ह प्रोफाइलमुळे उरलेल्या दृष्टीदोष/ रिफ्रॅक्टिव एरर अधिक चांगल्या प्रकारे सांभाळले जाते. 94% रुग्ण त्यांच्या एकूण दृष्टीबद्दल चष्म्याशिवाय समाधानी होते.फ्रीफॉर्म डिफ्रॅक्टिव्ह प्रोफाइलमुळे त्रासदायक प्रकाशाशी संबंधित दृष्टीतील अडचणी कमी प्रमाणात दिसतात. 93% रुग्णांनी कोणत्याही प्रकारच्या दृष्टीतील अडचणींची तक्रार केली नाहीटेक्निस ओडिसी कमी प्रकाशातही उत्कृष्ट कॉन्ट्रास्टसह स्पष्ट दृष्टी प्रदान करते. 92% रुग्णांना रात्री पायऱ्या आणि रस्त्याचे कड (कर्ब) स्पष्टपणे दिसण्याबाबत समाधान वाटले. फुल व्हिज्युअल रेंज देणारा टेक्निस ओडिसी आयओएल, आता भारतात उपलब्ध आहे.


**ग्रुप ग्रामपंचायत चावंड ता. जुन्नर जि. पुणे**

**पंचायत समिती जुन्नर, जिल्हा परिषद पुणे**

सन २०२५/२६ ग्रामपंचायत चावंड ता. जुन्नर, जी. पुणे यांचे तर्फे ग्रामविकास विभाग/ जिल्हा परिषद पुणे यांचेकडील पंजीकरण केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र कंत्राटदार यांजकडून दोन लिफाफा पद्धतीने यातील कामांच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाचा कालावधी | निविदा प्रसिद्ध दिनांक वेळ | निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | केळी माणकेश्वर येथे ग्रामपंचायत मोकळ्या जागेत सुशोभीकरण करणे | 424011 | 400 | सूट | सहा महिने | ०९/०४/२०२६ सकाळी 11:00 वाजता पासून | १७/०४/२०२६ सायंकाळी ०५:०० पर्यंत | २०/०४/२०२६ | जि. प. पुणे नोंदणीकृत सु.भे.आ. |

वरील कामाची सविस्तर निविदा पत्रके ग्रामपंचायत नोटीस बोर्ड/ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर कामाबाबत निविदा, अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील ग्रामपंचायत कार्यालय चावंड येथे पाहावयास मिळेल.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
चावंड, ता. जुन्नर, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत चावंड, ता. जुन्नर, जि. पुणे



**पंचायत समिती हवेली**

जाहीर बी-1 निविदा सूचना क्र. 6/2025-26

पंचायत समिती हवेली ता. हवेली जि. पुणे यांचे यतीने गटविकास अधिकारी (नि.श्रे.) पंचायत समिती हवेली यांचे तर्फे खालील कामाचे नावा समोर नमूद केल्याप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या कंत्राटदाराकडून खालील लेखा शिर्षांतर्गत कामांच्या सीलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना उप अभियंता बांधकाम हवेली निविदा शाखा यांच्या कार्यालयातून दिनांक १०/४/२०२६ ते दिनांक २१/४/२०२६ पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) दुपारी ३.०० वाजेपर्यंत देणेत येतील. सीलबंद भरलेल्या निविदा शाखा बांधकाम विभाग पंचायत समिती हवेली ता. हवेली जि. पुणे येथे दिनांक २१/४/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यानंतर कार्यालयीन सोईच्या दिवशी सक्षम समिती समोर उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम रु. | एकूण अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | आवश्यक कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोजे ग्रा.पं. खानापूर ग्रामपंचायत कार्यालय विस्तारीकरण करणे ता. हवेली जि.पुणे | ४०९३६६/- (GST वगळून) | ५९०/- | ४०९४/- | ८१८८/- | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |

• निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे •

1) कोऱ्या निविदा संचासाठी अर्जा सोबत उपरोक्त कामांचे नावासमोर नमूद केल्याप्रमाणे योग्य त्यावर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र मूळ प्रती दाखविल्या नंतर त्यांना कोरे निविदा संचासाठी भरणा चलन तयार करुन देण्यात येईल.
2) कोऱ्या बी १ नमुन्याची रक्कम रोख स्वरुपात चलनाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा जि.प.पुणे ग.वि.अ. पं.स.हवेली खाते क्र. 029001700023/001 यांचे खात्यावर चलन भरुन दाखविल्यास निविदा उपलब्ध होतील.
3) सिलबंद निविदेच्या लिफाफा क्र. 1 मध्ये खालील प्रमाणे कागदपत्राच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.
   अ) जि.प. कडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत
   इ) इसारा रकमेचा पुणे येथे देय होणारा ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने धनाकर्ष डीडी. (D.D.) काढणेत यावा. बयाणा रक्कम सूट प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही. तसेच सु.बे.अ. व म.स.स.यांनी ही बयाणा रक्कम भरणे बंधनकारक आहे.
   ई) पॅनकार्ड व जीएसटी प्रमाणपत्र (टिप उपरोक्त कागदपत्रां पैकी एकही कागदपत्र सादर केलेले नसल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल व लिफाफा क्र. 02 उघडणेत येणार नाही. तसेच कोणतेही कागदपत्र सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. तसेच निविदा दर सादर करताना जीएसटीचा विचार करुन निविदा दर सादर करावी)
4) सिलबंद निविदेच्या लिफाफा क्र. 2 मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वतःचा सही व शिक्का असलेला तसेच दर अंकी व अक्षरी लिहीलेला व खात्याने साक्षांकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.
5) पात्र निविदाधारकाकडून विहीत सुरक्षा अनामत रक्कमही कामाचा करारनामा करते वेळी गट विकास अधिकारी (नि.श्रे.) पंचायत समिती हवेली जि.पुणे यांचे नावे ठेव पावती स्वरुपात/चलनाने रोख स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित अनामत रक्कम प्रथम देयकातून कपात केली जाईल.
6) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 1% पेक्षा कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत भरणेची आवश्यकता नाही.
7) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 1.01 ते 10% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदाराने निविदाधीन कामाच्या किमतीच्या १% एवढ्या रकमेचा पुणे येथे देय असलेल्या ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला निविदा प्रसिध्दीच्या दिनांकाच्या तारखेचा धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉर्मंस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. निविदादेकार 1% पर्यंत कमी असलेस अतिरिक्त सुरक्षा अनामत भरणेची आवश्यकता नाही. (उदा. 1 ते 10% पर्यंत कमी दर 1 टक्के रक्कम)
8) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10% पेक्षा जास्त दराने कमी दराचा असेल तर देकार 10% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढ्या रकमेचा वरील (4) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह हवेली येथे देय असलेला ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉर्मंस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. (उदा. 10% पर्यंत कमीदर 1% व (10% ते 15% कमी दरा प्रति टक्का १% दराने) 5% असे एकूण 6% रक्कम)
9) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% पेक्षा कमी असलेस देकार 15% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे त्याच्या दोन पटीन वरील (5) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह हवेली येथे देय असलेला ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉर्मंस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. (15% पर्यंत कमी एकूण 6% रक्कम व 19% पर्यंत कमीदर (19%-15) 4% * 2 = 8%) असे एकूण 14% रक्कम सदर डी.डी. सादर केला नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल.
10) निविदा प्रपत्रातील व निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला / संस्थेला निविदा फेटाळल्या बद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

सही/-
गट विकास अधिकारी (नि.श्रे.)
पंचायत समिती हवेली

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महापालिका ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयात कर्मचारी झोपेत; कारवाईची मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निगडी येथील ‘अ’ क्षेत्रीय कार्यालयातील विद्युत विभागात नागरिकांना सेवा मिळण्यात अडचणी येत असल्याचा प्रकार समोर आला आहे. नागरिक भेटीसाठी येत असताना संबंधित कर्मचारी झोपलेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे माहिती न मिळाल्याने नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. या संदर्भात भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, नागरिकांच्या कामासाठी असलेल्या कार्यालयात कर्मचारीच निष्क्रिय असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांवर तातडीने दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत आयुक्तांकडे तक्रारही दाखल करण्यात आली आहे.



### राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून येथे प्रवेश अर्जासाठी मुदतवाढ


पिंपरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज (RIMC), डेहराडून प्रवेश पात्रता परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. या परीक्षेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांना आता १५ एप्रिल २०२६ पर्यंत आवेदनपत्र सादर करता येणार आहे. ही परीक्षा ७ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध व्हावी यासाठी ही मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संबंधित विभागाने दिली आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून करण्यात आले आहे.



### गजानन नगरातील पाणी समस्येवर अखेर तोडगा, नागरिकांना मोठा दिलासा

■ नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांचा पाठपुरावा

पिंपरी (दैनिक संध्या) : रहाटणी प्रभागातील गजानन नगर परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून भेडसावत असलेल्या कमी दाबाच्या पाणीपुरवठ्याच्या समस्येवर अखेर तोडगा काढण्यात आला आहे. संबंधित भागात नवीन जलवाहिनीला जुन्या मुख्य जलवाहिनीशी जोडण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याने नागरिकांना आता नियमित आणि पुरेशा दाबाने पाणी मिळणार आहे. या समस्येबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या. त्याची तात्काळ दखल घेत नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांनी आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत ही समस्या अल्पावधीत मार्गी लागली. काम पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, पाणीपुरवठा सुरळीत झाल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता ऋषिकेश गेंगजे, कनिष्ठ अभियंता समीक्षा मालपुरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भविष्यातही नागरिकांच्या मूलभूत समस्यांचे निराकरण प्राधान्याने करण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली आहे.




### हॉटेल व्यावसायिकाला मागितली खंडणी; स्वयंघोषित ‘भाई’ला पोलिसांकडून अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी परिसरातील यमुनानगर येथील एका हॉटेलमध्ये जाऊन शिवीगाळ करत १ लाख रुपयांची खंडणीची मागणी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एका २३ वर्षीय महिलेने फिर्याद दिली असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ११.१५ वाजण्याच्या सुमारास यमुनानगर, निगडी येथील खान्देश तडका हॉटेलमध्ये आरोपी विशाल प्रल्हाद देवकर (वय ३२, रा. बोदवड, जि. जळगाव) हा आला. त्याने “मी गुन्हेगार आहे” असे म्हणत हॉटेलमध्ये शिवीगाळ केली आणि हॉटेल चालवायचे असल्यास १ लाख रुपयांची खंडणी देण्याची मागणी केली. पैसे न दिल्यास मारहाण करून हॉटेल तोडण्याची धमकीही दिली. या घटनेप्रकरणी ७ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास निगडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धुमाळ करीत आहेत.

# स्थायी समिती सभेत विविध विषयांना मंजुरी



पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या स्थायी समितीच्या आज झालेल्या बैठकीत शहरातील विविध विकासकामे व विभागनिहाय प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात पार पडलेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे होते.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे होते. यावेळी स्थायी समिती सदस्य शालिनी गुजर, मनीषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारिका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, अर्चना करांडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन, सविता आसवानी, शीतल वर्णेकर, संतोष कोकणे, संदीप वाघेरे, विकास साने, सुलभा उबाळे यांच्यासह नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील विविध केमिकल टाक्यांना सुरक्षा आवरण उभारणे व अनुषंगिक कामे करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच प्रभाग क्र. २ मधील मोशी-बोऱ्हाडेवाडी परिसरात स्थापत्य विषयक कामे, नाल्यांची व पावसाळी चेंबर्सची साफसफाई तसेच चिखली-मोशी भागातील स्वच्छतागृहांची कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. ९ मधील नेहरूनगर व खराळवाडी येथे स्थापत्य विषयक कामे तसेच प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरव येथे रोड फर्निचर दुरुस्तीची कामे करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्र. १६ अंतर्गत रावेत, किवळे, मामुर्डी, विकासनगर, साईनगर, कोतवालनगर येथे रस्ते दुरुस्ती, महापालिका इमारती, स्मशानभूमी व इतर आवश्यक ठिकाणांची देखभाल-दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच रावेत येथील इंद्रप्रभा सोसायटी रस्त्यावर रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे महापारेषण कंपनीचे १३२ केव्ही क्षमतेचे दोन वीज मनोरे हलविण्यास मान्यता देण्यात आली.

प्रभाग क्र. १७ मधील महापालिका इमारती व इतर ठिकाणांची देखभाल-दुरुस्ती तसेच वाल्हेकरवाडी येथील रस्ते दुरुस्तीची कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. याशिवाय ग, ड, ब, फ व ई क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध झोपडपट्टी परिसरांमध्ये (आदर्शनगर, मिलिंदनगर, शास्त्रीनगर, सुभाषनगर, कैलासनगर, महात्मा गांधीनगर, इंदिरानगर, बलदेवनगर, संजय गांधीनगर, तापकीरनगर, आण्णाभाऊ साठे नगर, काळाखडक-म्हातोबानगर, वेताळनगर, विजयनगर, मोरयानगर, एम.बी. कॅम्प, नागसेननगर, भोईरनगर, संतोषनगर, दुर्गानगर, अजंठानगर, राजनगर, सम्राटनगर, सिद्धार्थनगर, मोरेवस्ती, गांधीनगर, बालाजीनगर, शांतीनगर) येथे स्थापत्य दुरुस्ती, गटार व स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे आदी कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. महापालिका शाळा, दवाखाने व मुख्य प्रशासकीय इमारतीची देखभाल-दुरुस्ती व फर्निचर कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सार्वजनिक शौचालयांची उच्चदाब पाण्याच्या फवाऱ्याद्वारे यांत्रिकी पद्धतीने व मनुष्यबळाच्या सहाय्याने दैनंदिन साफसफाई, देखभाल व किरकोळ दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय, स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत GIS सक्षम ERP प्रणालीसाठी व्हर्च्युअल मशिन उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

आरोग्य विभागांतर्गत नवीन थेरगाव, जिजामाता, भोसरी, तालेरा रुग्णालय तसेच ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे मेमोरियल हॉस्पिटल येथे कार्यरत तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्यास तसेच यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयांतर्गत शंकरराव मासुळकर नेत्र रुग्णालयासाठी उपकरण खरेदीस मंजुरी देण्यात आली. संत तुकाराम महाराज संतपीठासाठी आवश्यक तरतूद वर्ग करणे, ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सावित्रीबाई फुले उद्यानातील उर्वरित विद्युत कामे पूर्ण करणे, अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व महात्मा फुले जयंतीनिमित्त तात्पुरती ध्वनी व प्रकाश व्यवस्था करणे तसेच प्रभागांतर्गत पाने-फुले-फळे-भाजीपाला स्पर्धा व इतर कार्यक्रमांसाठी तात्पुरती ध्वनीव्यवस्था, सीसीटीव्ही व प्रकाशयोजना करणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास स्थायी समिती सभेत मंजुरी देण्यात आली.

> पिंपरी चिंचवड शहराचा नियोजित आणि सर्वसमावेशक विकास साध्य करण्याच्या दृष्टीने आजच्या स्थायी समिती बैठकीत विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. रस्ते, पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य सेवा आणि झोपडपट्टी भागांतील मूलभूत सुविधा यांसारख्या विषयांवर लक्ष केंद्रित करून नागरिकांना अधिक दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. मंजूर कामे निश्चित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती**

## आम आदमी पार्टी महाराष्ट्र युवक आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी रविराज काळे

पिंपरी (दै. संध्या)




आम आदमी पार्टीने महाराष्ट्र राज्यातील संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि युवकांचे प्रश्न आक्रमकपणे मांडण्यासाठी महत्त्वाची घोषणा केली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून रविराज काळे यांची ‘आम आदमी पार्टी महाराष्ट्र युवक आघाडी’च्या प्रदेशाध्यक्षपदी अधिकृत निवड करण्यात आली आहे. रविराज काळे यांची पक्षाप्रती असलेली निष्ठा, जनसंपर्क आणि युवकांमध्ये असलेली त्यांची पकड लक्षात घेऊन ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. आगामी काळात राज्यातील सुशिक्षित बेरोजगार, विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि युवक धोरणाबाबत पक्षाची भूमिका तळागाळातील तरुणांपर्यंत पोहोचवण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. निवडीनंतर प्रतिक्रिया देताना रविराज काळे म्हणाले की, पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याबद्दल मी अरविंद केजरीवाल आणि पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानतो. महाराष्ट्रातील तरुणांच्या मनात प्रस्थापित राजकारणाविरुद्ध मोठा असंतोष आहे. शिक्षण, रोजगार आणि संधी यांसाठी आम आदमी पार्टी हाच सक्षम पर्याय आहे, हे आम्ही प्रत्येक युवकापर्यंत पोहोचवू. राज्याच्या कानाकोपऱ्यात युवक आघाडीचे संघटन अधिक बळकट करणे हे माझे पहिले उद्दिष्ट असेल.”

या निवडीबद्दल पक्षाच्या विविध स्तरांतून त्यांचे स्वागत होत असून, सोशल मीडियाच्या माध्यमातूनही युवकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रक्तकेंद्रात पुरेसा रक्तसाठा उपलब्ध; कोणताही रुग्ण रक्ताविना परत नाही

*दररोज ६० ते ७० बॅग्जचे वितरण; आगामी रक्तदान शिबिरांतून ६०० रक्तपिशव्यांचे संकलन अपेक्षित*

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या रक्तकेंद्रात येथे विविध रक्तघटकांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शहरातील गरजू रुग्णांना सातत्याने रक्तपुरवठा करण्यात येत आहे. आजच्या स्थितीनुसार रक्तकेंद्रात लाल रक्तपेशींच्या २१५ बॅग्ज, प्लाझ्माच्या २१३ बॅग्ज, प्लेटलेट्सच्या ४ बॅग्ज तसेच क्रायो प्रेसिपिटेटच्या १५ बॅग्ज असा एकूण ४५० रक्तघटकांचा साठा उपलब्ध आहे, अशी माहिती यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी दिली आहे. सद्यस्थितीत दररोज सरासरी ६० ते ७० रक्तघटकांच्या बॅग्जचे वितरण विविध रुग्णालयांना व गरजू रुग्णांना करण्यात येत आहे. वाढत्या मागणीचा विचार करून रक्तकेंद्राने नियोजनबद्ध पद्धतीने साठा व्यवस्थापन केले असून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीतही रक्ताची कमतरता भासू नये यासाठी दक्षता घेतली जात आहे. उर्वरित दिवसांमध्ये शहरात सहा ते सात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून त्यामधून अंदाजे ६०० रक्तपिशव्यांचे संकलन अपेक्षित आहे. याशिवाय दररोज सरासरी ८ ते १० रक्तदाते रक्तकेंद्रात येऊन रक्तदान करत आहेत. आवश्यकतेनुसार अधिक रक्तदात्यांना आवाहन करून तातडीने रक्तसंकलन वाढविण्याची तयारीही रक्तकेंद्राने ठेवली असल्याची माहितीही डॉ. वाबळे यांनी दिली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने रक्तपुरवठा ही अत्यावश्यक सेवा अखंडितपणे सुरू ठेवण्यात आली असून आतापर्यंत शहरातील एकाही गरजू रुग्णाला ‘रक्त उपलब्ध नाही’ या कारणास्तव परत जावे लागलेले नाही. नागरिकांनीही सामाजिक जबाबदारी म्हणून नियमित रक्तदान करून या सेवेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन रुग्णालयाच्या वतीने करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेमार्फत रक्तसंकलन, साठवण आणि वितरण याचे प्रभावी व्यवस्थापन केले जात असून आगामी काळातही ही सेवा अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून नागरिकांना वेळेवर आणि पुरेसा रक्तपुरवठा होणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील रक्तकेंद्रात उपलब्ध असलेला साठा आणि त्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन याची दक्षता घेतली जात आहे. आगामी रक्तदान शिबिरे आणि नागरिकांचा वाढता सहभाग यामुळे भविष्यातील गरजाही प्रभावीपणे पूर्ण करता येतील, असा विश्वास आहे. नागरिकांनीही नियमित रक्तदान करून या जीवनदायी कार्यात सहभागी व्हावे.
> **- डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या रक्तकेंद्रात सध्या सर्व आवश्यक रक्तघटकांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शहरातील गरजू रुग्णांना अखंडितपणे रक्तपुरवठा केला जात आहे. दररोज होणाऱ्या वितरणाचा विचार करून साठा व्यवस्थापन नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात येत आहे. आगामी रक्तदान शिबिरांमधून रक्तसंकलन वाढवून संभाव्य मागणी पूर्ण करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. आतापर्यंत एकाही रुग्णाला रक्तअभावी परत जावे लागलेले नाही, ही आमच्यासाठी महत्त्वाची बाब असून नागरिकांनीही नियमित रक्तदान करून या सामाजिक कार्यात सहभाग नोंदवावा.
> **- डॉ. राजेंद्र वाबळे, अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय**

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या तिजोरीवर ५२ कोटींचा दरोडा

### स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांचा मुख्य लेखाधिकाऱ्यांवर आरोप

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या तिजोरीवर लेखा विभागातील मुख्य अधिकारी आणि ठेकेदारांनी मिळून दरोडा टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संपूर्ण महाघोटाळ्याचे मुख्य सूत्रधार महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन असल्याचा गंभीर आरोप स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी पत्रकार परिषदेत केला. जैन यांनी सर्व प्रशासकीय नियम धाब्यावर बसवून ५२ कोटींहून अधिक रकमेची बिले ठेकेदारांना परस्पर अदा केली असल्याचे बारणे यांनी सांगितले.

नुकतेच सन २०२६-२७ चे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे. मात्र, या अंदाजपत्रकामध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद नसताना सुमारे ७० पेक्षा जास्त कामांची बिले रात्रीतून काढण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने स्थापत्य आणि पाणीपुरवठा विभागाच्या कामांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, ज्या विभागांची ही कामे होती, त्या विभागप्रमुखांना या प्रक्रियेची कोणतीही पुसटशी कल्पना नसल्याचे समोर आले आहे. या घोटाळ्यासाठी ‘बोगस’ उपसूचनांचा आधार घेतल्याचा संशय व्यक्त होत आहे. सुमारे २० हून अधिक नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन विविध ७० कामांना मंजुरी मिळवण्यात आली. यामध्ये भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या नगरसेवकांचा समावेश आहे. संबंधित नगरसेवकांकडे विचारणा केली असता, त्यांनी आपल्या प्रभागातील कामांसाठी स्वाक्षऱ्या केल्या होत्या, मात्र या तांत्रिक प्रक्रियेबद्दल त्यांना कोणतीही माहिती नसल्याचे स्पष्ट केले. सभापती अभिषेक बारणे यांनी या प्रकरणाला ‘थेट दरोडा’ असे संबोधले असून, प्रवीण जैन यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत त्यांचे निलंबन होत नाही, तोपर्यंत शांत बसणार नाही असा इशाराही त्यांनी दिला आहे. आता पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी या गंभीर प्रकरणात काय पावले उचलतात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत रिक्त पदांचा प्रश्न गंभीर

पिंपरी (दै. संध्या)

■ भरती प्रक्रिया तातडीने राबवण्याचे महापौर रवी लांडगे यांचे निर्देश



पिंपरी - चिंचवड महानगर पालिकेतील विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्यामुळे रिक्त पदांचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला तातडीने रिक्त पदे भरण्याचे निर्देश दिले आहेत. महापौरांनी म्हटले आहे की, शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता प्रशासनिक यंत्रणा सक्षम राहणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या अनेक विभागांमध्ये मनुष्यबळाची कमतरता जाणवत असून त्याचा थेट परिणाम नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांवर होण्याची शक्यता आहे. यासाठी सर्व विभागांनी विद्यमान तसेच आगामी काळात रिक्त होणाऱ्या पदांची सविस्तर माहिती तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच आवश्यक पदांसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवून भरती प्रक्रिया गतीमान करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. महापौर कार्यालयाकडून या प्रक्रियेवर नियमित पाठपुरावा केला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

# बिर्ला हॉस्पिटलजवळ पवना नदीपात्रात बेकायदेशीरपणे काम सुरू

### नदी पात्रात भराव टाकून अतिक्रमण, झाडांची कत्तल; तातडीने कारवाई करण्याची मारूती भापकर यांची मागणी

पिंपरी (दै. संध्या)



चिंचवड परिसरातील आदित्य बिर्ला रुग्णालयाजवळ पवना नदीच्या पात्रात बेकायदेशीर कामे सुरू असल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक मारूती भापकर यांनी केला आहे. खेळाचे मैदान विकसित करण्याच्या नावाखाली नदीपात्रात भराव टाकणे, झाडांची तोड करणे तसेच लहान झाडांना मातीखाली गाडण्याचे प्रकार सुरू असल्याने तातडीने कारवाई करण्याची मागणी भापकर यांनी केली आहे. मारूती भापकर यांनी याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. त्यांच्या निवेदनानुसार, संबंधित ठिकाणी मोठ्या प्रमाणावर माती टाकून नदीपात्र अरुंद केले जात आहे. त्यामुळे पवना नदीचे नैसर्गिक प्रवाह आणि अस्तित्व धोक्यात येण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तसेच नदीकाठावरील झाडांची तोड करून काही झाडांचे बुंधे मातीखाली दडपण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे परिसरातील जैवविविधतेवरही गंभीर परिणाम होऊ शकतो, असे नागरिकांचे म्हणणे आहे. महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून या प्रकरणाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत भापकर यांनी तातडीने संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी करून सुरू असलेली कामे थांबवावीत, तसेच सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे पवना नदी संवर्धनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रशासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### कोष्टी समाजाचा स्तुत्य उपक्रम; सावर्डे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

सावर्डे (दैनिक संध्या) : श्री देवांग कोष्टी समाज सेवा मंडळ रत्नागिरी यांच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष श्री गजानन गणपत लोकरे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबिर शनिवार दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी सकाळी १०.० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत कोष्टी समाज मंदिर, सावर्डे (वहाळफाटा) तालुका चिपळूण येथे पार पडणार आहे. या सामाजिक उपक्रमासाठी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्ट डेरवण हॉस्पिटल यांचे मोलाचे सहकार्य लाभणार आहे. समाजातील गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि समाजात रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदात्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी ,अल्पोपहार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या उपक्रमात नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे. असे आवाहन श्री देवांग कोष्टी समाज सेवा मंडळ रत्नागिरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### अमृतानुभव पतसंस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहार; ठेवीदारांची पोलिसांत धाव

आळंदी (दैनिक संध्या) : अमृतानुभव नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये खातेदार व ठेवीदारांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकरणी पीडितांनी आळंदी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे ठेवीदारांमध्ये चिंतेचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. तक्रारीनुसार, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विविध योजनांच्या नावाखाली ठेवीदारांची दिशाभूल करून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात रक्कम जमा करून घेतल्याचा आरोप आहे. मात्र, मुदत पूर्ण होऊनही रक्कम परत मिळत नसल्याने अनेक ठेवीदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. दरम्यान, पीडित खातेदार व ठेवीदारांनी एकत्र येत पोलिसांकडे धाव घेतली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच अडकलेली रक्कम तातडीने परत मिळवून द्यावी, अशी मागणी केली आहे. या प्रकरणामुळे शहरात चर्चेला उधाण आले असून, संबंधित पतसंस्थेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### चोरीचे रेशन धान्य विकणाऱ्या केडगाव बाजार समिती मध्ये महसुल विभागाची मोठी कारवाई

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुक्यातील केडगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गाळ्यात काळ्या बाजारामध्ये विक्रीस ठेवलेले रेशनचे धान्य जप्त करीत जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत यवत पोलिसांनी व दौंड महसूल विभागाकडून दि.७ एप्रिल रोजी मोठी कारवाई करण्यात आली आहे. सुमारे १० लाख ६९ हजार ८५६ रुपयांचा गहू व तांदळाचा साठा जप्त करण्यात आला आहे अशी माहिती यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी दैनिक संध्याला दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केडगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आडतदार सुनिल विश्वनाथ निंबाळकर यांनी भाडोत्री घेतलेल्या गाळ्यात पांढऱ्या रंगाचे नायलॉनचे ४५ ते ५० किलोग्राम वजनाचे एकूण ४९२ कट्टे यामध्ये गहू किंमत ८ लाख ८५ हजार ६०० रुपये व ४५ ते ५० किलोग्राम वजनाचे एकुण १४४ पांढरे रंगाचे नायलॉनचे कट्टे तांदूळ किंमत २ लाख ८४ हजार २५६ रुपये असा एकूण १० लाख ६९ हजार ८५६ रुपये किंमतीचा सरकारमान्य रास्तभाव दुकानातील माल प्रथमदर्शनी आपले ओळखीचे गिऱ्हाईकाना काळ्याबाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने जिन्नस वस्तू साठवणूक करण्याचे परवाना मुदत २०१८ साली संपलेली असताना देखील सदर गाळ्यात हा धान्याचा साठा आढळून आला आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ प्रमाणे पंकज गोपाळ गोरे, पुरवठा निरीक्षक, दौंड तहसील यांच्या फिर्यादीनुसार सुनिल निंबाळकर (रा. केडगाव,ता.दौंड) यांच्यावर दि. ८ एप्रिल रोजी यवत पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किशोर वागज हे करीत आहेत. या कारवाईमुळे केडगाव परिसरात खळबळ उडाली असून, अवैध साठेबाजीवर पोलिसांनी व महसूल विभागाने केलेल्या कारवाईमुळे नागरिकांमधून त्यांचे कौतुक होत आहे.

### माऊली मंदिराला सागवानी नवा पाणदरवाजा; संकष्टीच्या मुहूर्तावर पूजन

आळंदी (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथे जुन्या पाणदरवाजाऐवजी अत्यंत देखणा व मजबूत असा शुद्ध सागवानी नवा पाणदरवाजा बसविण्यात आला आहे. श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळ यांच्या वतीने ही सेवा साकारण्यात आली असून, संकष्टी चतुर्थीचे औचित्य साधत दरवाजाचे शास्त्रोक्त पूजन करण्यात आले. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर (बल्लारशाह) येथून आणलेल्या सागवान लाकडापासून साकारलेल्या या पाणदरवाजासाठी सुमारे तीन महिन्यांचा कालावधी लागला असून, त्याची किंमत अंदाजे साडे सहा लाख रुपये आहे. दरवाजावरील सुबक नक्षीकाम भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. या मंगल प्रसंगी देवस्थानचे विश्वस्त राजेंद्र उमाप, भावार्थ देखणे, चैतन्य महाराज लोंढे, पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे तसेच उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय नगरसेवक, नगरसेविका, ग्रामस्थ, मंडळाचे पदाधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. माऊलींच्या चरणी ही उत्कृष्ट लाकडी कलाकृती सेवा म्हणून अर्पण केल्याबद्दल मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी पाणदरवाजा निर्मितीत योगदान देणाऱ्या कारागिरांचा सेवा सन्मान प्रमाणपत्र व माऊलींची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला. “श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानने आम्हाला ही पवित्र सेवा करण्याची संधी दिली, याचा संपूर्ण समाजाला अभिमान आहे. आद्य संत भोजलिंग काका यांच्या परंपरेचा हा वारसा पुढे नेण्याचा हा प्रयत्न आहे,” अशी भावना मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# अटल भूजल योजना बंद; शेतकऱ्यांचा आक्रोश

**सदर योजना तात्काळ सुरू करण्यासाठी शरदचंद्रजी पवार यांच्याकडे बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांची धाव**

**बारामती (दै. संध्या)**

केंद्र शासनाने अचानक बंद केलेल्या अटल भूजल योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, “शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणारा हा निर्णय केंद्र सरकारने तात्काळ मागे घ्यावा,” अशी आक्रमक मागणी आज बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली.

गोविंद बाग येथे तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्यांनी ज्येष्ठ नेते आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांची भेट घेतली.



अटल भूजल योजने अंतर्गत शेडनेट,पॉलिहाऊस,ठिबक सिंचन यांसारख्या अत्यावश्यक कृषी सुविधांसाठी महाराष्ट्र शासनाची ५० टक्के सबसिडी सोडुन तब्बल २५ टक्के अधीकची सबसिडी केंद्र शासनाकडून मिळत होती.मात्र केंद्र सरकारने ही योजना अचानक थांबवल्याने हजारो शेतकऱ्यांची आर्थिक गणिते कोलमडली आहेत.

“आधीच नैसर्गिक संकटे, बाजारभावातील चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे.

त्यातच ही योजना बंद करून केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे,” अशी संतप्त प्रतिक्रिया उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर मा.सदाशिव बापू सातव व कृषिभूषण प्रल्हाद गुलाबराव वरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी एकत्र येत ही योजना तात्काळ सुरू करण्याची मागणी आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या कडे केली.शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेत व या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन लवकरच केंद्र सरकारशी चर्चा करून मार्ग काढण्याचे आश्वासन पवार साहेब यांनी दिले.

“शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे,अन्यथा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल,” असे मत पवार साहेब यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करताना व्यक्त केले. या बैठकीस उपस्थित बारामती तालुक्यातील शेतकरी अनिल बालगुडे, बबनराव बोरकर, कल्याण काटे, गौरव जाधव, पांडुरंग मासाळ व मधुकर बोरकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## चालकाच्या प्रसंगावधानामुळे ४० ते ४५ लोकांचे वाचले जीव

**नारायणगाव(दै. संध्या)**

कल्याण - अहिल्यानगर महामार्गावरील रस्त्याच्या बाजूला असलेल्या साईडपट्ट्या ठेकेदाराने न भरल्यामुळे बुधवार दि. 8 रोजी बेल्हे -गुळुंचवाडीच्या शिवेवर गेवराई -नालासोपारा ही एसटी बस रस्त्याखाली घसरली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील 40 ते 45 प्रवाशांचा जीव वाचून अपघात टाळण्यास मदत झाली. कल्याण -अहिल्यानगर महामार्गावर सध्या सिमेंट काँक्रीटचे काम जोमाने सुरू आहे. हे सिमेंट काँक्रीटचे काम सुरू असताना रस्त्याच्या कडेला साईड पट्ट्या करणेही गरजेचे आहे. साईड पट्ट्या न केल्यामुळे दुचाकी चार चाकी वाहनांचा अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे.बुधवारी अशीच एक घटना बेल्हे -गुळुंचवाडी येथून एक एसटी जात असताना चालकाला रस्त्याच्या कडेला असलेल्या साईडपट्ट्यांचा अंदाज न आल्याने रस्त्याच्या कडेला गेली. सुदैवाने ती एसटी खड्डयात जाता जाता वाचली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील 40ते 45 लोकांचा जीव वाचला. असे अपघात घडू नये म्हणून प्रशासनाने तातडीने लक्ष घालून हे काम लवकरात लवकर आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्थानिक ग्रामस्थांनी दिला आहे.

## श्री. शिवम सीमा राजेंद्र वारे यांचा भंडारी मंडळाकडून यथोचित सत्कार

**डोंबिवली(दै. संध्या)**

प्रतिकुल परिस्थिती, कुटुंबियांचे सहकार्य व मार्गदर्शन, चिकाटी व अभ्यासू वृत्ती मेहनत करून शिवम वखरे यांनी यशाला गवसणी घातली.त्यांची आयपीएस(भारतीय पोलीस सेवा) श्रेणीत निवड झाली.त्यांच्या या उज्वल यशाबद्दल शिवम सीमा राजेंद्र वखरे यांचा डोंबिवली येथील भंडारी मंडळाकडून निरंजन सोसायटी येथील कार्यालयात यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र शिक्षण संघटना अध्यक्ष सुहास मिर्लेकर, ग्लोबल टाईम्सचे संपादक रामचंद्र खडपे, शाखा प्रमुख व रिक्षा युनियन संघटना प्रमुख सुधीर पाटील, शिवसेना(उबाठा) सचिव



बाबा सातार्डेकर, समाजसेवक बाळकृष्ण भिल्लारे, तसेच उत्सव मुर्ती शिवम वखरे यांचे वडील पोलीस अधिकारी राजेंद्र वखरे व इतर मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. सुहास हिर्लेकर यांनी आपल्या भाषणात सत्कारमूर्ती शिवम वखरे यांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.मंडळाचे अध्यक्ष गोपाळकृष्ण वराडकर, यांनी उपस्थितांसमोर मंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. तसेच कार्यकारी मंडळातील संजय पोखरणकर,रहुवीर तांडेल, गोपाळकृष्ण वराडकर, प्रदीप पाटील, हे विश्वस्त तसेच मंडळाचे सदस्य वैभव शिरोडकर सपत्नीक आवर्जून उपस्थित होते.मंडळाचे अध्यक्ष रजनीश चौगुले यांनी सूत्रसंचालन करून व आपल्या कुशल भाषण शैलीत शेरोशायरी करून उत्सवमूर्तींचे गोड कौतुक केले.भंडारी मंडळाच्या वतीने आयपीएस अधिकारी शिवम वखरे यांना शाल, श्रीफळ व गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.भंडारी समाजाने केलेल्या या हृदयद्रावक सत्काराने आयपीएस अधिकारी शिवम वखरे भारावून गेले.आपल्या भाषणात परिक्षेत सुयश मिळविण्याकरिता वडील व कुटुंबातील सदस्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आपले मत व्यक्त केले.शेवटी सांगता सोहळ्यात मान्यवर व उपस्थितांचे आभार मानून शिवम वखरे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## जळीतग्रस्त कुटूंबाला माऊली सेवा प्रतिष्ठानचा मदतीचा हात

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

भीषण आगीत संसाराची राख रांगोळी झालेल्या ठाकर समाजातील गरीब कुटुंबाच्या मदतीला धावून आले राजगुरुनगर मधील समाजसेवक संसारोपयोगी वस्तू,कपडे, किराणा व आर्थिक मदत देऊन सावरले जळीत ग्रस्त कुटुंबाला खेड तालुक्यातील जऊळके बुद्रुक गावातील आदिवासी ठाकर समाजातील राहुल सिताराम खंडागळे यांच्या राहत्या घराला सोमवार दिनांक ६ रोजी दुपारी भीषण आग लागली होती.या आगीत खंडागळे यांचेकडील ८ मोठ्या शेळ्या, ५-६ लहान बकरे, काही कोंबड्या तसेच घरातील सर्व साहित्य तसेच रोख रक्कम रु.60000/- साठ हजार रुपये रुपये आगीत जळून खाक झाले. त्यामुळे खंडागळे यांचे मोठे नुकसान होऊन त्यांचे कुटुंब अक्षरशः





उघड्यावर आले .

या घटनेची माहिती कळताच राजगुरूनगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून या कुटूंबास साधारण दोन महिने पुरेल एवढा किराणा आणि महिला, पुरुष व लहान मुलांसाठी मोठया प्रमाणात कपडे देण्यात आले. तसेच राजगुरूनगर सहकारी बँकेचे संचालक गणेश थिगळे व रोहिणी थिगळे यांनी या जळीतग्रस्त कुटुंबास दहा हजार रुपयांची आर्थिक मदत केली. राहुल खंडागळे हे मूळचे आंबेगाव तालुक्यातील गावडेवाडी गावचे असून मोलमजुरी करण्यासाठी खेड तालुक्यातील जउळके बुद्रुक येथे सध्या वास्तव्यास होते.या घटनेने आदर्श गाव गावडेवाडी येथील ग्रामस्थानी देखील मोठया प्रमाणात आर्थिक मदत जमा केली असून, या जळीतग्रस्त कुटूंबाला भेट देऊन मदत देण्यासाठी गणेश थिगळे, रोहिणीताई थिगळे, माऊली सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे, सदस्य मुख्याध्यापक संजय घुमटकर, अविनाश पाटील, विकास थिगळे, राहुल थिगळे,योगेश शिंदे दीपक मोरे स्वप्नील जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

## अज्ञातांकडून चारचाकीला आग – वाहन जळून खाक

**कवठे येमाई (दै. संध्या)**

शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई गावठाणात मोहाचा आड रस्त्यानजीक मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात समाजकंटकांनी घरासमोर उभी असलेली चारचाकी गाडी पेट्रोल टाकून जाळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीत वाहनाचे मोठे नुकसान झाले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निलेश हनुमंत राजगुरू यांच्या मालकीची इको गाडी (क्र. MH12 LP 2172) लक्ष्य करून हा प्रकार घडवण्यात आला.तत्पूर्वी यात्रेदरम्यान याच गाडीची मागील काच ही फोडण्यात आल्याची घटना घडली होती. घटनास्थळाजवळ पेट्रोलची बाटली आढळल्याने हा हल्ला पूर्वनियोजित असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.त्या परिसरात रस्त्याला सीसीटीव्ही नसल्याने कुठलाही धागादोरा उपलब्ध झाला नाही. रात्री दीडच्या सुमारास हा प्रकार घडला असल्याचे व गाडी पेटल्याचे लक्षात आल्याने व स्थानिकांनी आरडाओरड केल्याने जमा झालेल्या नागरिकांनी तात्काळ आग विझवली.घटनेची माहिती त्याच रात्री शिरूर पोलिसांना दिल्यानंतर ते तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या घटनेत निलेश राजगुरू यांच्या गाडीचा आतील भाग,सीट,साउंड सिस्टम,काचा ही फुटल्या असून व इतर साहित्य जाळून खाक झाल्याने त्यांचे मोठे च आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी टाकळी हाजी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अज्ञात आरोपींचा शोध सुरू आहे.

## वयोवृद्ध पुरुषाचा खून करून जबरी चोरी करणारे दोन गुन्हेगार अटकेत

**नारायणगाव (दै. संध्या)**

मंचर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दामोदर जयराम मिंडे (वय ६२ वर्षे रा. थोरांदळे पाईनमळा, ता. आंबेगाव जि पुणे) हे त्यांच्या शेतावरील घरात झोपलेले असताना अनोळखी चोरट्यांनी घरात प्रवेश करून त्यांच्या डोक्यात लोखंडी पहारने मारून त्यांचा खून केला आणि सोन्याची अंगठी, रोख रक्कम, मोबाईल असा एकूण २९,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला असल्याची फिर्याद मयत दामोदर मिंडे यांची मुलगी सौ शितल सतिश गावडे (वय ४० वर्षे रा. बेंडमळा, मंचर ता. आंबेगाव जि. पुणे) यांनी नोंदविली आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल,अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सुरू केला, घटनास्थळी भेट देऊन पथकाने सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, दोन इसमांचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले. उपलब्ध फुटेजच्या आधारे पुढील तपास करण्यात आला. गुन्ह्यातील आरोपींनी पॅशन मोटार सायकलचा वापर करून गुन्हा केल्यानंतर खोडद-बेल्हे मार्गे पारनेर बाजूकडे गेले असल्याचे निष्पन्न झाले. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पारनेर परिसरात तपास करत असताना गोपनीय बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, नमूद गुन्हा हा कबीर उंबऱ्या काळे रा. पुणेवाडी ता. पारनेर जि. अहिल्यानगर याने केला असून त्याच्या जवळ पॅशन मोटार सायकल आहे. मिळालेल्या बातमीच्या आधारे खात्री करून तपास पथकाने दि. ०५/०४/२०२६ रोजी सापळा लावून पुणेवाडी परिसरातून आरोपी १) कबीर उंबऱ्या काळे (वय २४ वर्षे सध्या रा. पुणेवाडी, ता. पारनेर जि. अहिल्यानगर, मुळ रा. सुरेगाव ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर) व एक विधीसंघर्षित बालक यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला असता, त्यांनी नमूद गुन्हा केल्याचे सांगितले असून गुन्ह्यात वापरलेली पॅशन मोटार सायकल हस्तगत करण्यात आलेली आहे.

# वारीच्या ९९ वर्षाच्या साक्षीदाराचे स्ट्रक्चरल ऑडीट सुरू

**पुलाच्या मोऱ्यांच्या दगडाचे घेतले जाते नमुने**

**नीरा (दै. संध्या)**

श्री.संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मार्गावरील तसेच पुणे - सातारा जिल्ह्याच्या सीमेवरील नीरा नदीवरील ९९ वर्ष जुना असलेल्या ब्रिटिशकालीन पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजच्या टीमकडून गुरूवारी (दि.९) सुरू करण्यात आले. राष्ट्रीय महामार्ग प्रधिकरणाने इंजिनिअरिंग कॉलेजच्या टीमला नीरा नदीच्या ब्रिटीश कालीन पुलाचा सविस्तर स्ट्रक्चरल ऑडीट करण्यास सांगितल्याचे सुत्रांनी सांगितले. दरम्यान स्ट्रक्चरल ऑडीटचा अहवाल जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाल्यानंतरच नीरा नदीवरील ब्रिटीशकालीन पुल वाहतुकीस अथवा वापरण्यास सुरक्षित आहे का नाही हे समजू शकणार आहे.

पुणे - सातारा जिल्ह्याच्या सीमेवरील नीरा नदी वरील सुमारे शतकभर जुना असलेला ब्रिटीशकालीन पुल पाडण्याचे आदेश पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी यांनी २३ फेब्रुवारीला दिले होते. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या



पालखी सोहळ्याशी ऐतिहासिक व भावनिक नाते असलेला हा पुल पाडण्याऐवजी पुलाचा ऐतिहासिक वारसा आणि सुरक्षेचा प्रश्न यामध्ये समतोल साधत तो कसा जतन करता येईल हे पाहणे गरजेचे होते. मात्र सुरक्षिततेचा मुद्दा पुढे करून पुल पाडण्याचे जिल्हाधिका-यांनी आदेश दिल्यानंतर नीरा व पाडेगाव परिसरात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर नीरा ग्रामपंचायत व भाजपचे माजी विस्तारक योगेंद्र माने यांनी प्रशासनाकडे पत्रव्यवहार करून फेरविचार करण्याची मागणी केली होती. संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा आळंदीहून पंढरपूरकडे जाताना नीरा नदी पार करतो आणि याच पुलावरून दत्त घाटावर नीरास्नानासाठी

माऊलींच्या पादुका नेल्या जातात.त्यामुळे या पुलाला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. पुर्वी जास्त पाऊस असेल आणि नीरा नदीला पुर आल्यावर पालखी सोहळ्याला सासवड–शिरवळ–लोणंद मार्गे जावे लागत असल्याने नीरा नदीवर पूल उभारण्याची मागणी पुढे आली होती. त्यानंतर १९२७ साली ब्रिटीशकाळात वाल्हे येथील अभियंता कृष्णा मांडके यांनी वैयक्तिक खर्चातून या पुलाचे बांधकाम केले. त्यानंतर नीरामार्गे पालखी सोहळा लोणंदला जावू लागला. जवळपास ९९ वर्षे उलटूनही हा दगडी पूल आजही भक्कम स्थितीत असल्याचा दावा नीरा - पाडेगांव येथील ग्रामस्थांचा आहे.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पुण्याच्या

> नीरा नदीवरील ब्रिटीशकालीन पुलाचे सविस्तर स्ट्रक्चरल ऑडीटचे काम पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजच्या टीमकडून सुरू आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाला सादर केला जाईल.
> **- अभिजित औटी, प्रबंधक - तांत्रिक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे**

शिवाजीनगर येथील शासकीय इंजिनिअरिंग कॉलेजच्या टीमला नीरा नदीवरील ब्रिटीशकालीन पुलाचे ऑडीट करण्याबाबत सुचना केल्याने गुरूवारी (दि.९) शासकीय इंजिनिअरिंग कॉलेजची टीम प्रत्यक्षात बांधकाम असलेल्या पुलाच्या मोरीच्या दगडांचे तांत्रिक पद्धतीने नमुने घेण्याचे तसेच पुलावरून अवजड वाहनाची चाचणी घेण्याचे काम करीत होती.

पुण्याच्या शासकीय इंजिनियरींग कॉलेजचे प्रोफेसर डॉ.नामदेव हेडाव, सिनिअर प्रोजेक्ट इंजिनिअर सुमित गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्ट्रक्चरल ऑडीटचे काम सुरू आहे.

यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता फारूख सय्यद, महामार्ग अभियंता गिरीष के, सुनिलकुमार पवार ,भाजपचे माजी विस्तारक योगेंद्र माने , प्रहार संघटनेचे अध्यक्ष मंगेश ढमाळ, सुजित वाडेकर आदी उपस्थित होते.

दरम्यान, नीरा नदीवरील ब्रिटीशकालीन पुलाचा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे शासकीय इंजिनिअरिंग कॉलेजच्या टीमकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट काय येतो ते पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.


## थोडक्यात पण महत्वाचे...



### विक्रोळीत डॉ. अनघा राऊत यांचा सन्मान

मुंबई (दैनिक संध्या) : विक्रोळी कन्नमवार नगर येथील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाच्या वतीने ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून विद्या एज्युकेशन सोसायटीच्या उपमुख्य अधिकारी डॉ.अनघा राऊत यांचा मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व मंडळाची स्मरणिका देऊन सन्मान करण्यात आला.याप्रसंगी मंडळाचे आजीव सभासद व विकास हायस्कूलचे प्रशासकीय अधिकारी मोहन वत्स,यांच्यासह विद्या विकास एज्युकेशन सोसायटीच्या समन्वयक विजया राधाकृष्णन, विकास हायस्कूल मराठी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका दर्शना कर्नुक, तसेच विकास हायस्कूल इंग्रजी प्राथमिक विभागाच्या सहाय्यक शिक्षिका वंदना सूर्यवंशी आणि मंजुषा पाचपुते.आदि शिक्षक उपस्थित होते.राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त दांपत्य गुरूवर्य प.म राऊत व विद्या प.राऊत यांच्या डॉ.अनघा राऊत या स्नुषा आहेत.तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ.विनय प.राऊत यांच्या त्या पत्नी आहेत.

### रामदास आठवले आणि अभिनेत्री कंगना राणावत यांची विमान प्रवासात भेट



मुंबई (दैनिक संध्या) : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले आणि बहुचर्चित अभिनेत्री आणि भाजपच्या खासदार कंगना राणावत यांची कोलकाता ते मुंबई विमान प्रवासात भेट झाली. ना. रामदास आठवले यांच्या शेजारच्या सीटवर कंगना राणावत होत्या. त्यामुळे या विमान प्रवासात दोघांमध्ये चर्चा रंगली. कंगना राणावत यांचा सन 2020 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि शिवसेनेशी वाद झाला होता. त्यावेळी रिपब्लिकन पक्षाने कंगना राणावतची बाजु घेवुन पाठिंबा दिला होता. त्याची आठवण कंगना राणावत यांनी ना. रामदास आठवले यांना सांगुन त्यांचे आभार मानले. कंगना राणावत यांचे बांद्रा पाली हील येथील ऑफिसचा काही भाग मुंबई महापालिकेने नियमबाहय ठरवुन तोडला होता. ती चुकीची कार्यवाही होती. त्या ऑफिसच्या तोडफोडीमुळे कंगना राणावत यांचे मोठे नुकसान झाले. ती नुकसान भरपाई मिळवुन देण्यासाठी आपण प्रयत्न करु असे आश्वासन ना. रामदास आठवले यांनी अभिनेत्री कंगना राणावत यांना यावेळी झालेल्या चर्चेत दिले. कंगना राणावत यांचे अनेक चित्रपट लोकप्रिय झालेले आहेत. सद्या त्या नविन चित्रपटाची निर्मीती करीत आहेत. अभिनया सोबत त्या चित्रपट निर्मीती क्षेत्रातही त्यांनी प्रवेश केला आहे अशी माहिती अभिनेत्री कंगना राणावत यांनी ना. रामदास आठवले यांना दिली.

### पुण्यात नवकार महामंत्राचा भव्य गजर 30 हजारांहून अधिक भाविकांचा सहभाग

पुणे (दैनिक संध्या) : संपूर्ण विश्वाच्या शांती, सौहार्द आणि सकारात्मक ऊर्जेसाठी आयोजित 'विश्व नवकार दिवस' निमित्त पुण्यात भव्य सामूहिक नवकार महामंत्र पठणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. ९ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता पुण्यातील एस.पी. कॉलेज ग्राउंड येथे झालेल्या मुख्य कार्यक्रमाला सुमारे १५,००० हून अधिक भाविकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवली. या कार्यक्रमास जैन साधू-संतांचीही पावन उपस्थिती लाभली. यासोबतच येरवडा जेल, औंध-बाणेर जैन संघ, वडगाव शेरी जैन संघ आणि शांतिनगर जैन संघ या ठिकाणीही सामूहिक जपाचे आयोजन करण्यात आले. या सर्व ठिकाणांसह एकूण ३०,००० हून अधिक भाविकांनी नवकार महामंत्राच्या जपात सहभागी होत विश्वशांतीचा संदेश दिला. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (JITO) पुणे चॅप्टरच्या वतीने, जितो पुणेच्या अॅडव्हायजरीच्या सानिध्यात तसेच अध्यक्ष इंद्रकुमार छाजेड़, चीफ सेक्रेटरी दिनेश ओसवाल आणि सेक्रेटरी लक्ष्मीकांत खाबिया यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या साकारण्यात आला. विशाल जर्मन हँगर मंडप ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू एस.पी. कॉलेज ग्राउंडवर १५५ × ४०० चौ. फूटाचा विशाल जर्मन हँगर मंडप उभारण्यात आला होता. या मंडपामुळे हजारो भाविकांना उन्हापासून संरक्षण मिळाले आणि संपूर्ण कार्यक्रम अत्यंत सुव्यवस्थितपणे पार पडला. या कार्यक्रमासाठी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम तसेच दानशूर युवा उद्योगपती आदित्य धारिवाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या संपूर्ण आयोजनात जितो पुणेचे सह-सेक्रेटरी अॅडव्होकेट विशाल शिंगवी, खजिनदार दिलीप जैन, सह-खजिनदार रुपेश कोठारी, अमोल कुचेरीया तसेच उपाध्यक्ष विशाल चोरडिया, अजय मेहता, विनोद मांडोत आणि चेतन भंडारी यांच्यासह सर्व पदाधिकारी सक्रियपणे सहभागी झाले होते.या भव्य उपक्रमामुळे पुणे शहरातून संपूर्ण जगाला शांती, एकात्मता आणि मानवतेचा प्रभावी संदेश देण्यात आला. "संपूर्ण विश्वाच्या शांतीसाठी आयोजित या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक आहे. हजारो भाविकांनी एकत्र येऊन नवकार महामंत्राचा जप करत सकारात्मक ऊर्जेचा संदेश दिला. जैन साधू-संतांच्या पावन उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे समाजात एकता, शांती आणि सद्भावना वृद्धिंगत करण्याचा आमचा प्रयत्न राहील."

### भोगवटा महसूल निर्णयामुळे जमीन मोजणी फक्त 1 हजार रुपयात; चंद्रशेखर बावनकुळे



नागपूर (दैनिक संध्या) : शेतकऱ्यांना जमीन मोजणीसाठी पूर्वी दहा ते बारा हजार रुपयांचा खर्च करावा लागत होता. मात्र आता ही प्रक्रिया सुलभ करून केवळ एक हजार रुपयांत संपूर्ण मोजणी होणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नागपूर विमानतळ येथे ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. भोगवटा महसूल निर्णयाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना जमीन मोजणीसाठी पूर्वी दहा ते बारा हजार रुपयांचा खर्च करावा लागत होता. मात्र आता ही प्रक्रिया सुलभ करून केवळ एक हजार रुपयांत संपूर्ण मोजणी होणार आहे. खाजगी भूमापकांना परवानगी देण्यात आली असून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत त्यांची नियुक्ती केली जाईल. सरकारी भूमापक त्यांना प्रमाणित करतील. त्यामुळे सध्या ६० दिवस लागणारी मोजणी प्रक्रिया पुढील दीड वर्षात १५ दिवसांत पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मोजणीनंतर खरेदीखत व म्युटेशन प्रक्रिया पूर्ण केल्यास भविष्यातील वाद टाळता येतील, असेही त्यांनी नमूद केले. यवतमाळ जिल्ह्यातील वनहक्क आदिवासी दाव्यांबाबत त्यांनी सांगितले की, ग्रामस्तरीय समित्यांनी मंजूर केलेल्या अर्जांचा फेरआढावा सरकार घेणार आहे. आदिवासी शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होऊ दिले जाणार नाही आणि त्यांचे हक्क अबाधित राहतील, याची सरकार खबरदारी घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नागपूर शहरातील पाणीपुरवठ्याबाबत त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. शहरात सुमारे ४० टक्के पाणी गळती होत असून काही ठिकाणी अवैध पंप व व्यावसायिकांकडून अतिरिक्त पाणी उचल होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. अशा प्रकरणांवर कारवाईसाठी नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांवर अन्याय होणार नाही, यासाठी बैठक घेऊन चुकीचे निर्णय रद्द केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः सीताबर्डी आणि महाल भागात मंजूर क्षमतेपेक्षा जास्त पाणीउचल होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# रेवतीच्या भूमिकेसाठी मी प्रत्यक्ष आयुष्यातही पुटपुटायला लागले



मुंबई (दै. संध्या)

झी टीव्हीवरील कौटुंबिक नाट्य 'लक्ष्मी निवास' हे मध्यमवर्गीय कुटुंबांचे आयुष्य, नातेसंबंध आणि दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या तपशीलांचे हृदयस्पर्शी चित्रण करून प्रेक्षकांच्या मनाला हात घालत आहे. कथानक पुढे सरकत असताना मालिकेतील प्रत्येक पात्राची वेगळी ओळख आणि त्यांच्या स्वभावातील उबदारपणा प्रेक्षकांना अधिकाधिक आपलासा वाटत आहे आणि त्यामुळे 'लक्ष्मी निवास'ची दुनिया आणखी वास्तविक आणि जवळची वाटू लागली आहे.

प्रेक्षकांच्या मनात शांतपणे पण ठसठशीत ठसा उमटवणाऱ्या पात्रांपैकी एक म्हणजे रेवती, ही भूमिका मानसी श्रीवास्तव साकारत आहे. साधी, प्रेमळ आणि कुटुंबाची काळजी घेणारी रेवती आपल्या घरची आणि कुटुंबीयांची देखभाल करण्यातच खरा आनंद मानते. तिच्या स्वभावात उबदारपणा तर आहेच, पण सतत स्वतःशी पुटपुटण्याची तिची सवय प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेते आणि तिच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळेच आकर्षण मिळते. मालिकेत तिच्या या गोड सवयीमुळे दादीने तिला 'गुनगुनती गौरी' हे टोपणनावही दिले आहे, जे प्रेक्षकांसाठी एक लक्षात राहणारा गुण बनला आहे.

रोचक बाब म्हणजे मानसीच्या अभिनयातील हा छोटासा पण प्रभावी गुण तिच्या प्रत्यक्ष आयुष्यातही आपोआप उतरला. रेवतीची भूमिका नैसर्गिक वाटावी यासाठी मानसीने खऱ्या आयुष्यातही स्वतःशी पुटपुटायला सुरुवात केली आणि त्यामुळे हा हावभाव अभिनयापेक्षा तिच्या स्वभावाचा एक सहज भाग बनला. याबद्दल बोलताना मानसी श्रीवास्तव म्हणाली, "रेवती ही खूप साधी, प्रेमळ आणि सगळ्यांची काळजी घेणारी स्त्री आहे. आपल्या घराची आणि आपल्या माणसांची देखभाल करण्यातच तिला खरा आनंद मिळतो. तिच्या व्यक्तिमत्त्वातील हे वैशिष्ट्य मला लगेच आपलेसे वाटले कारण मला माझ्या खऱ्या आयुष्यातही लोकांची काळजी घेणे आवडते. तिची सर्वांत वेगळी सवय म्हणजे ती दिवसभर काम करताना स्वतःशीच पुटपुटत राहते. आणि एके दिवशी मला जाणवलं की मीही प्रत्यक्ष आयुष्यात पुटपुटायला लागले आहे. हे इतकं नैसर्गिकपणे घडलं की मला कळलंच नाही. अशा गोष्टी सहजपणे घडतात तेव्हा त्याचा परिणाम पडद्यावरही अगदी प्रामाणिकपणे दिसतो."

ती पुढे म्हणाली, "रेवती तिच्या जगाशी, तिच्या घराशी, स्वयंपाकघराशी आणि तिच्या माणसांशी अगदी घट्ट जोडलेली आहे आणि त्या आपलेपणाच्या भावनेशी मीही स्वतःला जोडू शकते. तिच्या बोलण्यात आणि वागण्यात तो साधेपणा आणि सहजपणा दिसावा म्हणून मीही तेच गुण आणण्याचा प्रयत्न केला आहे. अशा छोट्या-छोट्या बारकाव्यांमुळेच ती खरी वाटते." तिच्या नेमक्या अभिनयामुळे आणि बारकाव्यांवर दिलेल्या लक्षामुळे मानसी श्रीवास्तवने रेवतीच्या सवयी केवळ लक्षवेधीच नाही, तर मनमोहकही बनवल्या आहेत, त्यामुळे 'गुनगुनती गौरी' हा गुण मालिकेतील सर्वाधिक आवडल्या जाणाऱ्या पैलूंपैकी एक ठरला आहे. रेवतीचे हे गोड पुटपुटणे आणि मनाला स्पर्श करणारे क्षण अनुभवण्यासाठी पहा 'लक्ष्मी निवास' ही मालिका दर सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी 7:30 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## सोनी सब कलाकारांनी साजरा केला नेशनल सिब्लिंग्स डे

मुंबई (दै. संध्या)

भाऊ-बहिण हे आपले पहिले मित्र, कधी कधी कट्टर प्रतिस्पर्धी, आणि आयुष्यभराचा आधार असतात. बालपणीच्या खोड्या, छोट्या-छोट्या भांडणांपासून ते आयुष्याच्या चढ-उतारात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्यापर्यंत, सिब्लिंग्सचा बंध खरंच वेगळाच असतो. या नेशनल सिब्लिंग्स डे निमित्त सोनी सबचे कलाकार समरिध बावा, सचिन कवेथम आणि अक्षया हिंदालकर यांनी आपले अनुभव शेअर केले आणि या नात्याचे महत्त्व सांगितले. समरिध बावा, पुष्पा इम्पॉसिबल मध्ये अश्विनची भूमिका साकारत आहे, "भाऊ-बहिणीचं नातं हे सर्वात प्रामाणिक नातं असतं. यात कोणताही दिखावा नसतो, फक्त



खरी जोड असते. लहानपणी छोट्या गोष्टींवर भांडणं व्हायची, पण गरज पडली की आम्ही नेहमी एकमेकांसाठी उभे राहायचो. आजही ते माझे सर्वात मोठे सपोर्ट सिस्टम आहेत. पुष्पा इम्पॉसिबल मध्ये मी राशीचा भाऊ आहे आणि आमचं ऑनस्क्रीन नातंही खूप रिअल आहे. ऑफस्क्रीनही आम्ही कुटुंबासारखेच आहोत – सतत मजा करतो, हसतो आणि एकत्र वेळ घालवतो. हे नातं वेळेनुसार बदलतं, पण त्याची खरी सुंदरता कधीच कमी होत नाही." सचिन कवेथम, इत्ती सी खुशी मध्ये सिद्धूची भूमिका साकारत आहे, "माझ्यासाठी भाऊ-बहिण म्हणजे घराची भावना. आयुष्य तुम्हाला कुठेही घेऊन जावं, ते नेहमी तुम्हाला जमिनीवर ठेवतात. माझ्या आवडत्या आठवणी म्हणजे साध्या गोष्टी – एकत्र जेवणं, आतल्या गप्पा, आणि ती छोटी भांडणं जी फार काळ टिकत नाहीत. इत्ती सी खुशी मध्येही ऑनस्क्रीन भाऊ-बहिणींबरोबर शूट करणं मजेदार आहे. विशेषतः सुम्बुल नेहमी मला मार्गदर्शन करते. नेशनल सिब्लिंग्स डे आपल्याला या नात्याची किंमत जाणवून देतो." अक्षया हिंदालकर, पुष्पा इम्पॉसिबल मध्ये राशीची भूमिका साकारत आहे, ""भाऊ-बहिण तुम्हाला फारसे शब्द न वापरता समजून घेतात. ते तुमचे सर्वात मोठे चीअरलीडर असतात आणि गरज पडली तर तुम्हाला सत्य दाखवतात. माझ्या भाऊ-बहिणींबरोबरच्या नात्यात मी नेहमी प्रामाणिकपणा आणि आपुलकी अनुभवली आहे. हे नातं प्रेम, शिकवण आणि अनगिनत आठवणींनी भरलेलं आहे. ऑनस्क्रीन मी चिरागची बहीण आहे आणि ते सहज वाटतं. ऑफस्क्रीनही आम्ही सतत गप्पा मारतो, जेवण शेअर करतो आणि सेटवर मजा करतो." या कलाकारांच्या अनुभवातून स्पष्ट होतं की भाऊ-बहिणीचं नातं हे प्रेम, हसू आणि आयुष्यभराच्या आठवणींनी विणलेलं असतं आणि ते खरंच कधीही बदलणारं नाही.

## 'डेटा ब्रीच'चा धोका, तीन वर्षांत ४० हजारांवर सायबर सुरक्षा ऑडिट

नागपूर (दै. संध्या)

डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर सगळीकडेच होत असताना सरकारी यंत्रणांवर सायबर हल्ल्यांचा धोका सातत्याने वाढत आहे. अशा हल्ल्यांमुळे संवेदनशील माहिती लीक होण्याची किंवा डेटा ब्रीच होण्याची शक्यता निर्माण होते. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांवरून 'सर्ट-इन'ने (द इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम) सायबर सुरक्षेला अधिक बळ देण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. मागील तीन वर्षांत सरकारी संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमध्ये ४० हजारांहून अधिक सायबर सुरक्षा ऑडिट करण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. या ऑडिट्समध्ये सातत्याने वाढदेखील होत आहे, हे विशेष. देशातील सायबर सुरक्षेच्या घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यावर तातडीने प्रतिसाद देण्यासाठी 'सर्ट-इन' ही राष्ट्रीय संस्था कार्यरत आहे. सरकारी यंत्रणांवरील सायबर हल्ल्यांचा धोका लक्षात घेऊन 'सर्ट-इन'ने विविध सरकारी विभागांच्या डिजिटल प्रणालींचे नियमित ऑडिट करण्याचा पुढाकार घेतला आहे. या ऑडिटमुळे संगणक प्रणाली, सर्व्हर, नेटवर्क आणि डिजिटल पायाभूत सुविधांमधील सुरक्षेतील त्रुटी शोधून त्यावर उपाययोजना करता येतात.

## झूम ने भारतात झूम कॉन्टॅक्ट सेंटर सेवांच्या सुविधा वाढवल्या

पुणे (दै. संध्या)

झूम कम्युनिकेशन्स, इंक. (NASDAQ:ZM) यांनी आज जाहीर केले की भारतात झूम कॉन्टॅक्ट सेंटर साठी स्थानिक (नॅटिव्ह) फोन नंबरची सुविधा सुरू झाली आहे. ही सेवा महाराष्ट्र, तमिळनाडू (चेन्नई), मुंबई, दिल्ली NCR, कर्नाटक (बेंगळुरू) आणि आंध्र प्रदेश व तेलंगणा (हैदराबाद) या सहा टेलिकॉम सर्कलमध्ये उपलब्ध आहे. या सुविधेमुळे भारतातील कंपन्यांना ग्राहकांशी संपर्क साधणे अधिक सोपे होणार असून, नियमांनुसार आणि एआयच्या मदतीने उत्तम सेवा अनुभव देता येणार आहे. ही सेवा झूम इंडिया मार्फत दिली जाते. त्यांच्याकडे भारत सरकारच्या दूरसंचार विभागाचा (DoT) संपूर्ण भारतासाठी परवाना आहे. आता स्थानिक भारतातील नंबर उपलब्ध झाल्यामुळे कंपन्या त्यांच्या एजंट्स आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने क्लाऊड-आधारित कॉन्टॅक्ट सेंटर सेवा सहजपणे चालवू शकतात आणि स्थानिक नियमांचे पालन करू शकतात. झूम कॉन्टॅक्ट सेंटर हे एक कनेक्टेड प्लॅटफॉर्म आहे, जिथे व्हॉईस कॉल, व्हिडिओ, चॅट आणि इतर डिजिटल सेवा एकत्र मिळतात. यामध्ये प्रगत एआय फीचर्स असल्यामुळे एजंट्सना मदत मिळते आणि अनेक ग्राहकांशी संवाद अधिक जलद व अचूक पद्धतीने पूर्ण होतात. त्यामुळे ग्राहकांचा अनुभव सुधारतो आणि कामकाज अधिक कार्यक्षम बनते. वेलचामी शंकरलिंगम, अध्यक्ष (प्रॉडक्ट आणि इंजिनिअरिंग), झूम यांनी सांगितले, "ग्राहक सेवा क्षेत्रात मोठा बदल होत आहे.

## हायब इंडिया कडून देशव्यापी गर्ल ग्रुप ऑडिशनची घोषणा

मुंबई (दै. संध्या)

हायब इंडिया ने आज जाहीर केले की त्यांनी नवीन गर्ल ग्रुप ऑडिशनसाठी अर्ज खुले केले आहेत. टॅलेंट स्काऊटिंग 31 मार्च ते 31 जुलै 2026 दरम्यान होणार आहे.

या ऑडिशनमध्ये भारतभरातील 2005 ते 2011 दरम्यान जन्मलेल्या महिला टॅलेंटना आपली व्यक्तिमत्व आणि क्रिएटिव्हिटी दाखवण्याची संधी मिळणार आहे. अर्जाच्या कॅटेगरीमध्ये व्होकल्स, रॅप, डान्स, अभिनय, मॉडेलिंग आणि इतर परफॉर्मन्स प्रकारांचा समावेश आहे.

गर्ल ग्रुपवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय हा हायब इंडिया ने मागील काही वर्षांत केलेल्या ऑनलाइन आणि इन-पर्सन रिसर्चवर आधारित आहे. नील्सन सोबत केलेल्या देशव्यापी क्वांटिटेटिव्ह स्टडी आणि सहा प्रमुख शहरांतील क्वालिटेटिव्ह रिसर्चमधून हे स्पष्ट झाले की तरुण भारतीय महिलांना अशा कलाकारांची अपेक्षा आहे




जे त्यांच्या आवाजाचे प्रतिनिधित्व करतील आणि प्रेरणादायी रोल मॉडेल ठरतील. यावरून हायब इंडिया ने 'हार्मनी इन डायव्हर्सिटी' या संकल्पनेतून भारतीय महिलांच्या खरी कहाणी आणि आवाज जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणाऱ्या गर्ल ग्रुपची संधी ओळखली.

हायब इंडिया चे सीईओ डॉमियन वूचांग ली यांनी सांगितले की ही ऑडिशन भारतीय बाजारपेठेत कंपनीच्या दीर्घकालीन वचनबद्धतेचा अर्थपूर्ण पहिला टप्पा आहे. त्यांनी म्हटले, "भारतामध्ये कधीच टॅलेंट किंवा महत्त्वाकांक्षा कमी नव्हती—जे कमी होते ते म्हणजे जागतिक पातळीवर पोहोचण्यासाठी सातत्यपूर्ण मार्ग. आम्ही तो पूल बांधत आहोत: असा सिस्टीम जो कलाकारांना योग्य पद्धतीने घडवेल आणि त्यांना सीमांच्या पलीकडे पाहिले, ऐकले आणि समजले जाईल. ही ऑडिशन त्या प्रक्रियेची सुरुवात आहे." या ऑडिशनमध्ये ऑनलाइन सबमिशनसोबतच इन-पर्सन राऊंड्सही असतील. अहमदाबाद, बेंगळुरू, चंदीगड, चेन्नई, दिल्ली, गुवाहाटी, हैदराबाद, कोलकाता, मुंबई आणि पुणे या शहरांमध्ये प्रत्यक्ष ऑडिशन राऊंड्स आयोजित केले जातील. निवडक शहरांमध्ये ऑडिशन अनुभवाचा भाग म्हणून पॉप-अप ॲक्टिव्हेशन्सही होणार आहेत. याबाबत अधिक माहिती पुढील काही दिवसांत जाहीर केली जाईल. या ऑडिशनमध्ये अनेक स्ट्रॅटेजिक ब्रँड कोलॅबोरेशन्स आहेत. सॅमसंग आपल्या "तुमचं टॅलेंट जगाला दाखवा # गॅलेक्सीसह" कॅम्पेनद्वारे तरुणांना शिकण्याची, क्रिएट करण्याची आणि आत्मविश्वासाने जागतिक पातळीवर परफॉर्म करण्याची प्रेरणा देत आहे. एच अँड एम फॅशन आणि म्युझिकला सेल्फ-एक्सप्रेशनचे माध्यम मानत, उदयोन्मुख टॅलेंटना ऑडिशन-रेडी बनवण्यास मदत करत आहे. नॉन्गशिम शिन राम्युन 'स्पायसी हॅपिनेस' द्वारे भारतीय तरुणांचा ऑडिशन अनुभव अधिक रंगतदार करत आहे. शॉपर्स स्टॉप ने 'गेट स्पॉटलाइट रेडी' कॅम्पेन हायब इंडिया सोबत सुरू केले आहे, ज्यामुळे भारताचा पहिला ग्लोबल गर्ल ग्रुप स्वप्न साकार होईल. स्नॅपचॅट आणि बुकमायशो अनुक्रमे मीडिया आणि टिकटिंग पार्टनर म्हणून सहभागी होत आहेत. शहरनिहाय वेळापत्रकाची सविस्तर माहिती लवकरच हायब इंडिया च्या अधिकृत ऑडिशन वेबसाइट आणि सोशल मीडिया चॅनेल्सवर जाहीर केली जाईल.

# इकोलिंक बनले राजस्थान रॉयल्सचे असोसिएट स्पॉन्सर्स

मुंबई (दै. संध्या)

भारतात आता उर्जेने भरलेल्या टी २० मौसमाचे वारे सुरु झाले असतांनच, सिग्निफाय (युरोनेक्स्ट: लाईट) या जगभरांतील आघाडीच्या लायटिंग कंपनी तर्फे आज त्यांचा उदयोन्मुख ब्रॅन्ड असलेल्या युरोलिंक ने राजस्थन रॉयल्स बरोबरच्या भागीदारीची घोषणा करण्यात आली. या भागीदारी मुळे युरोलिंक हा टिमचा असोसिएट स्पॉन्सर बनला असून यामुळे ब्रॅन्डचे अस्तित्व हे भारतातील सर्वांत मोठ्या खेळाच्या मंचा बरोबर जोडले जाऊन त्याच बरोबर देशभरांतील कोट्यावधी अशा क्रिकेट फॅन्स बरोबर जोडले जाणार आहे.




या भागीदारी मुळे इकोलिंकच्या आगामी उत्पादनश्रेणीचा ही प्रसार होणार असून यामुळे ब्रॅन्डचे भारतीय ग्राहकांना कार्यक्षम आणि विश्वसनीय उत्पादने देण्याचे वचन अधोरेखित होणार आहे. ज्या प्रमाणे राजस्थान रॉयल्स त्यांच्या क्षेत्रात सर्वोत्तम देत असते त्या प्रमाणे इकोलिंक सुध्दा आरामदायकता आणि सोपेपणा हा देशभरांतील कोट्यावधी घरांना देत असते. या भागीदारीचा एक भाग म्हणून ब्रॅन्ड हा शिरस्त्राणांवर महत्त्वपूर्ण ठिकाणी झळकण्यासह त्यांच्या महत्त्वपूर्ण अशा प्रसार मोहिमांसह डिजिटल उपक्रमांमध्ये संपूर्ण स्पर्धे दरम्यान दिसणार आहे.

सिग्निफायच्या ग्रेटर इंडिया चे सीईओ आणि एमडी सुमित जोशी यांनी सांगितले " सिग्निफाय मध्ये आम्ही नाविन्य आणून आमच्या ग्राहकांना खरे मुल्य देण्यासाठी वचनबध्द आहोत. इकोलिंक हा एक उदयोन्मुख ब्रॅन्ड असल्याने आम्ही विश्वसनीय आणि योग्य उपाय हे भारतीय घरांना देण्यासाठी प्रयत्नशील असतो. देशभरींतल ब्रॅन्डचे अस्तित्व वाढवत असतांनाच इंडियन प्रिमियर लीग हा एक कोट्यावधी भारतीयांबरोबर जोडण्याचा उत्तम मंच उपलब्ध झाला आहे. राजस्थान रॉयल्स बरोबरच्या या भागीदारी मुळे आंम्हाला क्रिकेट चाहत्यां बरोबर जोडण्यासह संपूर्ण भारतातील घरांपर्यंत इकोलिंक ब्रॅन्ड पोहोचवणे शक्य होणार आहे. या भागीदारीतून ब्रॅन्डचे अस्तित्व मजबूत करुन जगभरांतील बदलत्या बाजारपेठांमध्ये वाढीची गती गतीमान करण्याची संधी आम्हाला मिळेल."

सिग्निफाय च्या ग्रेटर इंडिया चे स्ट्रॅटेजी आणि मार्केटिंग चे प्रमुख निखिल गुप्ता यांनी सांगितले " क्रिकेट हा खेळ भारताच्या सांस्कृतिकतेचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे ज्यामुळे ब्रॅन्ड्सना मोठ्या प्रमाणावरील प्रेक्षकांशी जोडले जाणे शक्य होते. आमच्या इकोलिंक बीएलडीसी फॅन्सना भारतीय ग्राहकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. राजस्थान रॉयल्स बरोबरच्या या भागीदारीतून आम्ही आमच्या मैदानातील अस्तित्व, शिरस्त्राणांवरील ब्रॅन्डिंग आणि एकात्मिक फॅन एंगेजमेंट उपक्रमांमुळे दृष्यमानता मिळवू शकू. ही भागीदारी म्हणजे ग्राहकांशी मजबूत जोडणी करण्याच्या आमच्या महत्त्वपूर्ण योजनेचा भाग असून इकोलिंक ला एक विश्वसनीय आणि उपलब्ध होणारा बीएलडीसी फॅन्सचा ब्रॅन्ड म्हणून कोट्यावधी भारतीय घरांमध्ये आम्ही पोहोचू शकू."

राजस्थान रॉयल्सचे सीओओ आलोक चित्रे यांनी सांगितले "इकोलिंक बरोबर भागीदारी करतांना आंम्हाला अभिमान वाटतो आणि आम्ही राजस्थान रॉयल्स परिवारात त्यांचे स्वागत करतो. रॉयल्स फॅन कम्युनिटीची पोहोच आणि अस्तित्व हे आपल्याला फॅन्स बरोबर जोडण्यासाठी एक शक्तीशाली मंच उपलब्ध करत असून यामुळे इन स्टॅन्डिया प्रेझेन्स, डिजिटल स्टोरीटेलिंग आणि वर्षभर जोडणी उपलब्ध होते. आंम्हाला आशा आहे की या भागीदारी मुळे आम्ही योग्य दृष्यमानता देऊन संपूर्ण मौसमात फॅन्सशी जोडण्याची संधी उपलब्ध होईल."

या भागीदारी मुळे इकोलिंक आणि आगामी टी २० सिरीजच्या मोठ्या प्रमाणावरील पोहोच एकत्र येणार असून यामुळे संपूर्ण भारतातील ग्राहकांशी जोडणे शक्य होणार आहे. जगभरांतील २० हून अधिक विश्वसनीय, उच्च क्षमते साठी प्रसिध्द असलेला इकोलिंक राजस्थान रॉयल्सच्या एकत्रित वचनबध्दतेनुसार म्हणजेच उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा सह कौशल्यांचा वापर, विश्वास निर्मिती, सातत्यपूर्ण कार्यक्षमता,विश्वसनीयता आणि कोट्यावधी फॅन्ससाठी अविश्वसनीय अनुभव निर्माण करण्यासारख्या गुणांनी युक्त आहे. कर्णधार रियान पराग आणि मुख्य प्रशिक्षक कुमार संगकारा यांच्या नेतृत्वाखाली राजस्थान रॉयल्स संघ मजबूत संघांसह या हंगामात उतरत आहे. या संघात वैभव सूर्यवंशी, रवींद्र जडेजा, यशस्वी जैस्वाल यांसारख्या प्रतिभावान खेळाडूंचा समावेश असून, ते संपूर्ण हंगामात रोमांचक कामगिरी करून चाहत्यांना गुंतवून ठेवण्यास सज्ज आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## हॉस्पिटलच्या मावशीचा प्रामाणिकपणा सोन्याची चैन केली परत

पुरंदर (दैनिक संध्या) : आज अनेक ठिकाणी बेइमानी करुन गडगंज होणारी माणसे आपण पहात आहे.परंतू अजून गरिबीतही प्रामाणिकपणा शिल्लक आहे. हे दाखविणारे उदाहरण सासवड येथील चिंतामणी हॉस्पिटल येथे पहायला मिळाले.चिंतामणी हॉस्पिटल चे संचालक डॉ विनायक बांदेकर यांचेकडे काही दिवसांपूर्वी ओजस्वी गणेश गायकवाड हे पेशंट आले होते. लहानग्या ओजस्वी कडून वडिलांच्या अंगाखांद्यावर खेळताना वडील गणेश यांची दोन तोळे वजनाची सोन्याची चैन आजच्या दरानुसार तीन लाख रुपये किंमतीची दिनांक ४ एप्रिल रोजी हॉस्पिटलच्या पार्किंग विभागात हरवली सगळीकडे शोधाशोध केली परंतु सापडत नव्हती. दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलच्या कर्मचारी नंदा घाडगे मावशी या सफाई करताना त्यांना सदर चेन मिळाली.त्यांनी लगेच हॉस्पिटलच्या प्रमुखांकडे सुपुर्द केली.व हॉस्पिटलच्या संचालकांच्या माध्यमातून गणेश गायकवाड यांना परत केली.त्यांच्या प्रामाणिकपणाने सर्वच भारावून गेले.गणेश गायकवाड यांचे सासरे रामचंद्र पवार यांनी घाडगे यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करीत भरल्या अंतःकरणाने त्यांना साडी चोळी देऊन सन्मानित केले.नंदा घाडगे यांच्या प्रामाणिकपणाचे चिंतामणी हॉस्पिटल संचालक डॉ संजय रावळ, डॉ विनायक बांदेकर,पांडुरंग गायकवाडव सर्व संचालक सर्व शहरवासीयांनी कौतुक केले.



## सासवड बार असोसिएशनवर महिलाराज, संपूर्ण कार्यकारणी बिनविरोध

**अध्यक्षपदी ॲड.भारती शिंदे; सचिवपदी ॲड. ललिता झेंडे**

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील सासवड बार असोसिएशनच्या सन २०२६-२०२७ च्या निवडणुकीत महिलांनी ऐतिहासिक कामगिरी करत संपूर्ण कार्यकारणी बिनविरोध निवडून आणली आहे.बार असोसिएशनच्या इतिहासात तसेच राज्यातही हा दुर्मिळ व अभिमानास्पद निर्णय मानला जात आहे.सर्व महिला सभासदांनी पदाधिकारी म्हणून वर्षभर काम करण्याची तयारी दाखवली. त्यामुळे बाकी पुरुष उमेदवार सभासदांनी एकमताने यावर्षी महिला सभासदांना काम करण्याची संधी देण्याचा विचार करुन मोठ्या मनाने त्यांची उमेदवारी अर्ज मागे घेतले. निवडणूक अधिकारी ॲड. नितीन जाधव व ॲड. नाझनीन आत्तार यांनी काम पाहिले.अध्यक्षपदी ॲड.भारती शिंदे, उपाध्यक्षपदी ॲड. सरला देवीप्रसाद तिवारी, महिला राखीव उपाध्यक्षपदी ॲड. गीतांजली शिवाजी मेमाणे (ढोणे), सचिवपदी ॲड. ललिता सचिन झेंडे, खजिनदारपदी ॲड. सानिया साजिद मणियार, हिशोब तपासनीसपदी ॲड. करिष्मा सलीम डांगे तर सहसचिवपदी ॲड. श्वेता विकास कुंजीर यांची बिनविरोध निवड झाली आहे. विशेष म्हणजे, या निवडणुकीत कोणतीही चुरस न होता सर्व पदांसाठी एकमताने महिला उमेदवारांना संधी देण्यात आली. त्यामुळे बार असोसिएशनमध्ये एकात्मता व सहकार्याची भावना अधोरेखित झाली आहे. महिला वकिलांनी नेतृत्वाची धुरा स्वीकारत संघटनेच्या कामकाजात नवचैतन्य आणण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. नवीन कार्यकारणी न्यायालयीन कामकाज अधिक सुकर करण्याबरोबरच वकिलांच्या विविध प्रश्नांवर ठोस भूमिका घेईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तसेच महिलांच्या सहभागामुळे सामाजिक व कायदेशीर क्षेत्रात सकारात्मक बदल घडतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सासवड परिसरातील विविध मान्यवरांनी या निर्णयाचे स्वागत करत नव्या कार्यकारणीला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पुणे कॅम्पमध्ये 'सिल्व्हर मोटर्स–निसान'च्या नव्या भव्य शोरूमचे शानदार उद्घाटन

## 'सिल्व्हर जुबिली ग्रुप'च्या सातत्यपूर्ण प्रगतीतील आणखी एक उल्लेखनीय कामगिरी






पुणे कॅम्प येथील 'सिल्व्हर मोटर्स – निसान'च्या नवीन शोरूमचे उद्घाटन करताना श्री. सौरभ वत्स; सोबत सौ. राजवर्धिनी जगताप, श्री. संजय जगताप, समरादित्य जगताप तसेच निसान मोटर इंडियाचे अधिकारी व मान्यवर.

**पुणे (दै. संध्या)**

दि. ७ एप्रिल २०२६ रोजी, पुण्यातील ऑटोमोबाईल क्षेत्रात १९३५ पासून विश्वासार्ह नाव असलेल्या सिल्व्हर जुबिली ग्रुपअंतर्गत कार्यरत सिल्व्हर मोटर्स – निसान या नव्या अत्याधुनिक शोरूमचे पुणे कॅम्प येथे भव्य उद्घाटन पार पडले. या शोरूमचे उद्घाटन निसान मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सौरभ वत्स यांच्या हस्ते झाले. यावेळी निसान मोटर इंडियाचे डायरेक्टर श्री. अभिषेक अरोरा, श्री. विवेक पल्लिवाल, श्री. राकेश नेगी, श्री. मृन्मय गोगोई तसेच निसानची टीम उपस्थित होती. भारतामध्ये निसानची उपस्थिती १९६५ पासून असून, भारतीय सैन्याने विश्वास ठेवत निसान पॅट्रोल ६० (जोंगा) वाहनाची निवड केली होती. विविध युद्ध मोहिमांमध्ये हे विश्वासार्ह वाहन ठरले असून, निसान हे ब्रँड भारतात विश्वासार्हतेचे प्रतीक आहे. सिल्व्हर जुबिली ग्रुपचा वारसा १९३५ पासून पुणे कॅम्प परिसरात पेट्रोल पंप, कार शोरूम व सर्व्हिस स्टेशनच्या माध्यमातून दृढपणे रुजलेला आहे. सिल्व्हर मोटर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक सौ. राजवर्धिनी संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प साकारण्यात आला आहे.

प्रमुख मान्यवर उपस्थिती : मा. आमदार रवींद्र चव्हाण (भाजप प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र), मा. राजेश पांडे (प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र), मा. आमदार संजय जगताप (भाजप प्रदेश सचिव, महाराष्ट्र), श्री. समरादित्य संजय जगताप, श्री. राजेंद्र पाटील, मा. खासदार अशोकअण्णा मोहोळ, मा. आमदार संग्रामदादा थोपटे, मा. आमदार दिलीपराव मोहिते, मा. आमदार रमेशअप्पा थोरात, मा. आमदार अशोकराव पवार, मा. आमदार अतुल बेनके, आमदार सुनील कांबळे, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. वीरधवल जगदाळे, श्री. हरिभाऊ लोळे, श्री. अजय इंगळे, सौ. स्वरूपाताई थोपटे, सौ. सुजाताताई पवार, श्री. तुषार थोरात, सौ. प्राजक्ता दुर्गाडे, डॉ. दिगंबर दुर्गाडे (चेअरमन, पीडीसीसी बँक), उपाध्यक्ष सुनील चांदेरे, माजी अध्यक्ष रमेश थोरात तसेच सर्व संचालक मंडळ, संत सोपानकाका सहकारी बँकेचे चेअरमन व सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी,

श्रीमती आनंदीकाकी चंद्रकांत जगताप (नगराध्यक्ष, सासवड नगरपालिका), सनदी अधिकारी डॉ. राजेंद्र चंद्रकांत जगताप (IDES), संरक्षण मंत्रालय – प्रिन्सिपल डायरेक्टर, सदर्न कमांड, सौ. केतकी शिर्के, सौ. नीताताई पाटील (पवार) सौ. गौरवी अतुल भोसले (चेअरमन, जागृती साखर कारखाना), संभाजी ब्रिगेडचे प्रवीणदादा गायकवाड, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी तसेच सिल्व्हर मोटर्सचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन शोरूममध्ये अत्याधुनिक वाहनांची श्रेणी उपलब्ध असून, आधुनिक सुविधा व ग्राहक-केंद्रित सेवेमुळे पुणेकरांना उत्कृष्ट अनुभव मिळणार आहे.

तसेच सिल्व्हर मोटर्स – निसान लवकरच पुणे शहर व जिल्ह्यात विस्तार करणार असल्याचे सांगण्यात आले.



## पोस्टाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन सत्र संपन्न

**कवठे येमाई (दै. संध्या)**

केंद्र सरकारच्या पोस्ट विभागातील विविध योजना बाबत सर्वसामान्य महिला व नागरिकांना अधिक माहिती मिळावी या उद्देशाने काल दि. ८ ला शिरूर तालुक्यातील कवठे येमाई ग्रामपंचायत सभागृहात सकाळी साडे अकरा वाजता पोस्टाच्या विविध लाभदायक योजनांबाबत माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत नागरिकांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मनीषा पांडुरंग भोर या होत्या. तर ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव,पुणे पोस्ट विभागाचे नामदेव गवळी व अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या माहिती सत्रात पुढील महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले पोस्टल जीवन विमा योजना, अपघाती विमा, उपचारांसाठीचा विमा (मेडिक्लेम), सुकन्या समृद्धी योजना, आधार कार्ड अद्ययावत करणे व नवीन आधार कार्ड नोंदणी प्रक्रिया इत्यादी महत्वपूर्ण माहिती दिली.

या कार्यक्रमाला गावातील अनेक महिला, भगिनी तसेच अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पोस्ट विभागाचे नामदेव गवळी यांनी उपस्थितांना योजनांचे फायदे, पात्रता निकष तसेच अर्ज प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती यावेळी दिली. नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये शासकीय योजनांबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली असून,नागरिकांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## मंदिर विकासासाठी मदत करणार : सत्यवानदादा बाळसराफ

**नारायणगाव (दै. संध्या)**

सालाबाद वर्षाप्रमाणे सावरगाव तालुका जुन्नर येथील समस्त आल्हाट परिवाराच्यावतीने मरीमाता महालक्ष्मी यात्रेचे नियोजन करण्यात आले होते.अशी माहिती लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्कार्थी तथा आद्यगुरु लहुजी साळवे महाराष्ट्र शासन स्मारक समिती सदस्य काशिनाथ आल्हाट यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा परिषद सदस्य गुलाबशेठ पारखे, सावरगावचे आदर्श सरपंच पै. दिपक बाळसराफ, मातोश्री उद्योग समूहाचे उद्योजक सत्यवान बाळसराफ, शिवसेना नेते रोहिदास गोरडे, पिंपरी चिंचवडचे सेवानिवृत्त आदर्श केंद्रप्रमुख दादाभाऊ आल्हाट, हलगी सम्राट एकनाथ आल्हाट, हलगी सम्राट सखाराम आल्हाट आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

जि. प. सदस्य गुलाब शेठ पारखे म्हणाले, "या देवीच्या मंदिराकडे येणा-या रस्त्यासाठी समन्वय साधून रस्त्याचे काम केले जाईल.

उद्योजक सत्यवानशेठ बाळसराफ म्हणाले, मंदिराच्या विकासासाठी मदत केली जाईल. सावरगाव येथील मरीमाता मंदिर, खंडेराया मंदिर आणि जानूबाई या मंदिराचा परिसर म्हणजे आमचे बालपण येथे गेले. "मंदिर परिसरातील या मातीचा स्पर्श माझ्या कपाळाला आहे.या यात्रेच्या निमित्ताने या ठिकाणी आल्यानंतर भूतकाळातील अनेक आनंदाच्या गोष्टींच्या आठवणी आल्या. त्यामुळे या मंदिराच्या विकासासाठी निश्चित मदत केली जाईल. आदर्श सरपंच पै.दिपक बाळसराफ म्हणाले "या देवीच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही"! बस्ती सावरगाव येथील आल्हाट परिवार हा उदरनिर्वाहाच्या निमित्ताने मुंबई, पुणे, तळेगाव या ठिकाणी वास्तव्याला मोठ्या प्रमाणात आहे. वर्षातून एक दिवस महालक्ष्मी मरीमाता यात्रेच्या निमित्ताने सर्वांना गावाला येण्यासाठी ही सुवर्णसंधी असते. पूर्वी या देवीच्या यात्रेचे स्वरूप अतिशय कमी प्रमाणात होते. परंतु अलीकडच्या काळात परिवार एकत्र येऊन सामाजिक विचार, वैचारिक विचारांच्या निमित्ताने समन्वय साधून मोठ्या प्रमाणात यात्रेचे नियोजन केले जाते. आल्हाट परिवाराचे महालक्ष्मी मरीमाता हे ग्रामदैवत मीना नदीच्या दक्षिण मुखावर वसलेले असल्याने, ते जागृत देवस्थान आहे. अशी भावना आहे.चैत्र महिन्यात उन्हाळा सुरू होतो. झाडांना नवी पालवी फुटते ,याच महिन्यात होळीचा सन असतो. या महिन्यात देवीची यात्रा म्हणजे एकमेकांच्या मनातील द्वेष ,राग ,लोभ सोडून परिवर्तनाची ही यात्रा ठरली जाते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुंबई रहिवासी सामाजिक कार्यकर्ते किशोर आल्हाट यांनी नवीन पिढीच्या तरुणांना सामाजिक भान यावरती विचार मांडले. "जेव्हा विचारांची देवाणघेवाण होते', तेव्हां ती व्यक्ती आपली वाटते. "व्यक्ती एकत्र आल्या की, समाज एकत्र येतो आणि समाजाला दिशा मिळते".



यात्रा कमिटीचे अध्यक्ष अजय आल्हाट यांनी सर्वांचे आभार मानले.अमित आल्हाट , विशाल आल्हाट ,संदिप आल्हाट, नरेंद्र आल्हाट,बिना आल्हाट ,संतोष आल्हाट, सचिन आल्हाट, सत्यम आल्हाट,गणेश आल्हाट यांनी विशेष परिश्रम घेतले.नरेंद्र मुरलीधर आल्हाट सर यांनी मंदिरासाठी लाईट फिटिंगचे योगदान दिले . तर गणेश आल्हाट, सचिन आल्हाट, प्रकाश आल्हाट मुंबई या बंधूंनी महाप्रसादाचा खर्च केला. गुणवंत कलावंत सनई सम्राट बबन आल्हाट यांच्या पारंपरिक वाद्यवंदाने मिरवणुकीची रंगत आणली.

# ३५ गंभीर गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगारास साथीदारासह अटक

**पुणे ग्रामीण पोलिसांची दमदार कामगिरी**

**खेड (दै. संध्या)**

३५ गंभीर गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगारास साथीदारासह अटक करून पुणे ग्रामीण हद्दीतील दोन व ठाणे शहर आयुक्तालयातील एक असे एकूण तीन खुनाचे गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे.स्थानिक गुन्हे शाखा व खेड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण पोलिसांची कामगिरी खेड पोलीस ठाणे गु.र.नं. १५३/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) प्रमाणे दि. १८/०३/२०२६ रोजी दाखल आहे. सदर गुन्ह्यात जैदवाडी ता. खेड जि. पुणे येथे मोकळ्या जमिनीत मयत नामे धनंजय मारुती घेवडे वय ३३ वर्षे, रा. राक्षेवाडी, ता. खेड जि.पुणे मुळ रा. कारेगाव ता. आंबेगाव, जि. पुणे याचा मृतदेह आढळून आला होता. मयताचे डोक्यावर व तोंडावर कोणत्यातरी हत्याराने मारहाण करणेत आली होती. मयत धनंजय घेवडे याचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून अज्ञात हत्याराने खून केला असल्याबाबत मयताचा भाऊ श्री. सचिन मारुती घेवडे वय ३६ वर्षे रा. कारेगाव ता. आंबेगाव जि. पुणे यांनी फिर्याद नोंदविली असल्याने वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.मा. पोलीस अधीक्षक सो पुणे ग्रामीण यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याचे अनुषंगाने मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या. सदर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाचे वतीने समांतर तपास सुरू करणेत आला. घटनास्थल हे दुर्गम भागात असल्याने सीसीटीव्हीचा अभाव होता. घटनास्थळापासून मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता, अभिलेखावरील सराईत गुन्हेगार ललित दिपक खोल्लम रा. शिरोली ता. खेड जि. पुणे व त्याचा एक साथीदार असे घटनास्थळापासून मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेरामध्ये आढळून आले. फुटेजमधील दुसऱ्या संशयिताची माहिती प्राप्त केली असता त्याचे नाव नंदलाल होले रा. कारेगाव ता. आंबेगाव जि. पुणे असे निष्पन्न होऊन तो देखील सराईत गुन्हेगार असल्याची माहिती मिळाली. ललित खोल्लम व नंदलाल होले हे सराईत गुन्हेगार असून ते खून झालेल्या घटनास्थळाच्या परिसरात आढळून आल्याने त्यांच्यावर संशय बळावला. स्था.गु.शा.चे पथकाने दोन्ही संशयितांच्या सीसीटीव्ही फुटेजचे आधारे खेड ते वडगाव निंबाळकर असे सुमारे ४५ किमी पर्यंत सलग सहा दिवस सुमारे ११० कॅमेऱ्यांचा मागोवा घेण्यात आला. दोन्ही संशयित गुन्हेगार हे वडगाव निंबाळकर परिसरात असल्याची बातमी गोपनीय बातमीदाराकडून मिळाली, दि. २५/०३/२०२६ रोजी स्था.गु.शा.चे पथक, खेड पो स्टे कडील पथक व वडगाव निंबाळकर पो स्टे कडील स्थानिक पोलीस अधिकारी मदत कामी सोबत घेऊन वडगाव निंबाळकर परिसरात योग्य पद्धतीने सापळा लावणेत आला. आजू- बाजूला असलेल्या उसाचे शेतांना घेराव घालणेत आला, संशयितांचा शोध घेत असताना पोलिसांची चाहूल लागल्याने दोन्ही गुन्हेगारांनी उसाचे शेतातून पळ काढून नदीचे दिशेने पळत सुटले, तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी अतिशय शीघ्रतेने पाठलाग करून आरोपींनी नदीपात्रात उडी मारण्यापूर्वीच शिताफीने दोघांनाही ताब्यात घेतले.



आरोपी १) ललित दिपक खोल्लम वय ३८ वर्षे, रा. शिरोली, शिंदेवस्ती ता. खेड जि पुणे, २) नंदलाल दिलीप होले वय ३१ वर्षे, रा. कारेगाव ता. आंबेगाव जि पुणे, यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपींकडे कौशल्यपूर्ण तपास करत आरोपींना विश्वासात घेतल्यानंतर आरोपींनी खुनाचे गुन्ह्यांची मालिका सांगितली. आरोपी नंदलाल होले व मयत धनंजय घेवडे असे एकाच गावात सध्या राहत आहेत, धनंजय घेवडे व नंदलाल होले यांचेच भांडण झाले होते, तसेच त्याच गावातील निलेश कैलास सणस याचेसोबत देखील धनंजय घेवडे याचा वाद होता, त्या वादाचे कारणावरून आरोपी ललित खोल्लम व नंदलाल होले यांनी मिळून संगनमताने (मयत) धनंजय मारुती घेवडे वय ३३ वर्षे, रा. राक्षेवाडी, ता. खेड जि.पुणे मुळ रा. कारेगाव ता. आंबेगाव, जि. पुणे याचे डोक्यात लोखंडी रॉड व दगडाने मारून खून केला असल्याचे कबूल केले आहे. आरोपी ३) निलेश कैलास सणस वय ३४ वर्षे, रा. कारेगाव ता. आंबेगाव जि. पुणे याने इतर आरोपींना गुन्हा करणेकरीता पैसे पुरविले असल्याची माहिती तपासात समोर आल्याने त्यास देखील गुन्ह्याचे कामी ताब्यात घेतले. तिन्ही आरोपींना अटक करणेत आलेली आहे.मयत धनंजय घेवडे याचा खून करण्यासाठी वापरलेले लोखंडी रॉड, दगड जप्त केला असून गुन्हा करताना आरोपीचे अंगावर असलेले कपडे त्यांनी जाळून टाकले होते, ते ठिकाण तपासून कपडे ज्या ठिकाणी जाळले आहेत, त्या ठिकाणावरील राख हस्तगत करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे आरोपींनी मयत धनंजय घेवडे याचा मोबाईल फोन हा गुन्हा करून जाताना वाफगाव गावाजवळील विहिरीत टाकून दिला होता, तो मोबाईल देखील हस्तगत करणेत आलेला आहे.

आरोपी ललित खोल्लम याची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून त्याचे विरोधात यापूर्वी ०२ खून, खुनाचा प्रयत्न ०१, दरोडा प्रयत्न ०२, जबरी चोरी १०, घरफोडी व चोरीचे २० असे एकूण ३५ गुन्हे सातारा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे शहर आयुक्तालय, हद्दीत दाखल आहेत. त्याचप्रमाणे आरोपीने जबरी चोरी करताना अवैध गावठी पिस्तुलाचा वापर केलेला आहे. आरोपी नंदलाल होले याचेवर देखील दरोड्याचा गुन्हा दाखल आहे. दोन्ही आरोपीवर यापूर्वी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करणेत आलेली असून ते सध्या जामिनावर बाहेर आले आहेत. आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याने त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता, आरोपी ललित खोल्लम याचे महिला नामे रूपाली विलास वाडेकर रा. शिरोली ता. खेड जि पुणे हिचे सोबत प्रेमसंबंध होते, त्याकारणातून ती नेहमी त्याच्याकडे पैसे मागत होती, पैसे मागण्याचे कारणावरून त्यांचे नेहमी भांडण होत होते, त्यादरम्यान तिचा मुलगा श्रीकांत वाडेकर हा देखील आरोपी ललित खोल्लम याचेकडे पैशाची मागणी करत होता. त्या गोष्टीचा राग आरोपी ललित खोल्लम याचे डोक्यात होता, रूपाली वाडेकर व श्रीकांत वाडेकर हे ठाणे येथे असताना दि.०७/११/२०२५ रोजी पैसे देतो अशी फुस लावून त्याने (मयत) श्रीकांत विलास वाडेकर वय २६ वर्षे मुळ रा. शिरोली ता. खेड जि पुणे यास खेड येथे बोलावून घेऊन त्याचे अपहरण केले आणि श्रीकांत वाडेकर यास शिरोली येथील फ्लॅट वर नेवून त्याचे डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून त्याचा खून केला आणि आरोपी नंदलाल होले याचे मदतीने श्रीकांत वाडेकर याचा मृतदेह मंचर परिसरात नेवून जाळून टाकला व मृतदेहाची विल्हेवाट लावली. तसेच मयताची राख गोळा करून घोडनदीपात्रात सोडून दिली असल्याचे तपासात निष्पन्न झाले.